दैनिक

# समर्थ राजयोग

SAMARTH RAJYOG

https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

वैभव विवेक स्वामी
संपादक

राजमान्य, राजशक्ती

No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | वर्ष - ६ वे अंक -१३ | शुक्रवार,दि.१९ सप्टेंबर २०२५ | 98 22 62 85 21 | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रु । पाने ४

Beed | Daily Marathi | Year-6th | Issue-13 | Friday, Dt.19 September 2025 | 98 22 62 85 21 | RNI - MAHMAR/2020/79801 | Price 3 Rs. | Pages 4




## दोन्ही मराठा आरक्षणविरोधी याचिका कोर्टाने फेटाळल्या

हैदराबाद गॅझेटवर हायकोर्टाचा मोठा निर्णय

मुंबई : मनोज जरांगे यांच्या आंदोलनानंतर मराठा समाजाला कुणबी जातीचे प्रमाणपत्र मिळावे यासाठी राज्य सरकारने हैदराबाद गॅझेटियर व सातारा गॅझेटियरच्या आधारे २ सप्टेंबर रोजी काढलेल्या अधिसूचनेला आव्हान देणा-या दोन जनहित याचिका उच्च न्यायालयात दाखल करण्यात आल्या होत्या. या याचिकांबाबत मुंबई उच्च न्यायालयाने महत्त्वाचा निकाल दिला आहे.

याचिका प्रलंबित असेपर्यंत या अधिसूचनेची अंमलबजावणी करू नये व त्याद्वारे कोणालाही कुणबी प्रमाणपत्र देऊ नये, अशी अंतरिम मागणी याचिकांद्वारे करण्यात आली होती. हैदराबाद गॅझेटियरच्या अंमलबजावणीला मान्यता देणा-या शासन निर्णविरोधातील याचिकेवर गुरुवारी मुंबई उच्च न्यायालयात सुनावणी पार पडली. वकील विनीत धोत्रे यांनी दाखल केलेल्या जनहित याचिकेवरच मुंबई उच्च न्यायालयाने सवाल उपस्थित केले. हैदराबाद गॅझेटच्या अंमलबजावणीला मान्यता देणा-या शासन निर्णयाविरोधातील पहिली जनहित याचिका मुंबई उच्च न्यायालयाने फेटाळली.

आता मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्णयाला याचिकाकर्ते सर्वोच्च न्यायालयात आव्हान देणार असल्याचे म्हटले जात आहे. तसेच याचिकाकर्त्याला रीट याचिका म्हणून सक्षम न्यायालयासमोर दाद मागण्याची मुभा मुंबई उच्च न्यायालयाने दिली आहे.

काय आहे याचिकेत?


## मुख्यमंत्र्यांच्या बंगल्याच्या डागडुजीवर लाखोंचा खर्च

### २० लाखांच्या सोफासेटची खरेदी विरोधी पक्षाचा आरोप

मुंबई : प्रतिनिधी

राज्यातला शेतकरी अतिवृष्टीने उद्धस्त झालेला असताना या शेतक-यांना मदत करण्यासाठी सरकारकडे पैसे नाहीत. राज्यावरील कर्जाचा बोझा ९.५ लाख कोटींच्या वर गेला आहे. पण दुसरीकडे मुख्यमंत्र्यांच्या वर्षा या शासकीय निवासस्थानात नवीन फर्निचरसाठी लाखो रुपये खर्च केले जात आहेत. डबल बेड मैट्रेस, सोफा यासाठी २०.४७ लाख रुपये, तर किचन दुरुस्तीसाठी १९.५३ लाख रुपये खर्च केला जात आहे. यास जनतेच्या पैशाची उतमात म्हणावे की वाढलेली महागाई? असा सवाल करत राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते रोहित पवार यांनी जोरदार टीका केली आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या निविदेनुसार वर्षा निवासस्थानी डबल बेड मॅट्रेससह ८ बेड, ४ डबल सीट सोफा सेट, २ सिंगल सीट सोफा सेट, १५ खुर्चा आणि ६ टेबल खरेदी केले जाणार आहेत. त्यासाठी २० लाख ४७ हजार रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. याशिवाय वर्षावरील स्वयंपाक घर



दुरुस्तीसाठी १९ लाख ५३ हजार रुपये किंमतीची निविदा काढण्यात आली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी या निर्णयावर टीका केली आहे. आज संपूर्ण राज्यात अतिवृष्टीने शेतकरी उद्धस्त झालेला असताना आणि राज्यावरील कर्जाचा बोझा ९.५ लाख कोटींच्या वर गेला असताना मुख्यमंत्र्यांच्या शासकीय निवासस्थानी डबल बेड मॅट्रेस, सोफा यासाठी २० लाख ४७ हजार रुपये तर किचन दुरुस्तीसाठी १९ लाख ५३ हजार रुपये असा एकूण ४० लाखांहून अधिक पैसा खर्च केला जात असेल तर यास जनतेच्या पैशाची उतमात म्हणावे की वाढलेली महागाई? असा सवाल पवार यांनी एक्स या समाज माध्यमातून केला आहे.

तर रोम जळत आहे : रोहीत पवार

मुख्यमंत्री यांना कदाचित हे माहित नसेल, पण हे असेच चालू राहिले तर 'रोम जळत आहे आणि निरो बासरी वाजवत आहे' असाच त्याचा अर्थ निघेल मंत्र्यांच्या घरांच्या दुरुस्तीची कामे केली पाहिजेत. पण केव्हा आणि त्यासाठी किती खर्च करावा याचाही ताळमेळ असला पाहिजे ना, असेही रोहित पवार यांनी आपल्या पोस्टमध्ये नमूद केले आहे.

## मेंदू खाणा-या अमिबाचे आतापर्यंत १९ बळी


### केरळमध्ये नागरिक भयभीत आरोग्य विभागाचा सतर्कतेचा इशारा

कोच्ची : केरळमध्ये अमीबिक इंसेफेलायटिस या दुर्मिळ आणि प्राणघातक आजाराने संक्रमित झालेल्या रुग्णांच्या मृत्युंची संख्या वाढत आहे. राज्यात आतापर्यंत १९ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. यामधून अनेक मृत्यू गेल्या काही आठवड्यात झाले असून आरोग्य विभागाने नागरिकांना अधिक सतर्क राहण्याचा इशारा दिला आहे.

या वर्षी केरळमध्ये अमीबिक इंसेफेलायटिसचे ६१ रुग्ण आढळले आहेत, ज्यामध्ये १९ रुग्णांचा मृत्यू झाला आहे. राज्याच्या आरोग्यमंत्री वीणा जॉर्ज यांनी म्हटले की केरळला सार्वजनिक आरोग्याच्या गंभीर संकटाचा सामना करावा लागत आहे. सुरुवातीला कोझिकोड आणि मलप्पुरम जिल्ह्यांमध्ये या संसर्गाचे प्रमाण जास्त होते, परंतु आता संपूर्ण राज्यात अमीबिक इंसेफेलायटिसचे रुग्ण आढळून येत आहेत. या रुग्णांमध्ये ३ महिन्यांच्या बाळापासून ते ९१ वर्षांच्या वृद्धापर्यंत समावेश आहे.

अमीबिक इंसेफेलायटिस म्हणजे काय?

हा आजार नेगलेरिया फाउलेरी नावाच्या सूक्ष्मजीवामुळे होतो. हा



सूक्ष्मजीव दूषित गोड्या पाण्यात, जसे की तलाव, नद्या, विहिरी आणि क्लोरीन नसलेल्या पाण्यात आढळतो. जेव्हा एखादी व्यक्ती दूषित पाण्यात पोहते किंवा डुबकी मारते, तेव्हा हा अमीबा नाकावाटे शरीरात प्रवेश करतो. शरीरात शिरल्यानंतर, हा अमीबा थेट मेंदूपर्यंत पोहोचतो आणि मेंदूच्या पेशींवर हल्ला करतो. यामुळे मेंदूच्या पेशी नष्ट होतात आणि संसर्ग झपाट्याने पसरतो, ज्यामुळे मेंदूला गंभीर इजा होते.

काय आहेत लक्षणे?

हा आजार सुरुवातीला सामान्य तापासारखा दिसतो, परंतु काही तासांतच तो गंभीर रुप धारण करतो. त्यात तीव्र डोकेदुखी, ताप, मळमळ आणि उलटी, मान ताठर होणे, वास आणि चवमध्ये बदल, गोंधळ, संतुलन बिघडणे आणि काही प्रकरणांमध्ये कोमामध्ये जाणे यांचा समावेश आहे. लक्षणे सुरू झाल्यानंतर साधारणत: ५ ते १८ दिवसांत मृत्यू होण्याची शक्यता असते.

#### कोणती काळजी घ्यावी?

तज्ज्ञांच्या मते, या संसर्गाचे पसरने अत्यंत वेगाने होते, त्यामुळे तातडीने निदान आणि उपचार न केल्यास रुग्णाला वाचवणे अत्यंत कठीण होते. यामुळे मृत्यूचे प्रमाण खूपच जास्त आहे. हा आजार दुर्मिळ असला तरी तज्ज्ञांनी नागरिकांना स्वच्छतेकडे लक्ष देण्याचा आणि अधिक सावधगिरी बाळगण्याचा सल्ला दिला आहे.

## विजेचा शॉक लागून २८ वर्षीय महावितरण कर्मचाऱ्यांचा मृत्यू

### मस्साजोग येथील महावितरण विद्युत केंद्रातील घटना

मस्साजोग /प्रतिनिधि

केज तालुक्यातील मस्साजोग येथील महावितरण विद्युत केंद्र येथे वीज पुरवठा सुरळीत करण्यासाठी गेलेल्या २८ वर्षीय महावितरण कर्मचाऱ्यांला वीजेचा धक्का बसून मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना दिनांक १८ सप्टेंबर गुरुवार रोजी सहा वाजण्याच्या सुमारास उघडकीस आली आहे.



या घटनेने मस्साजोगसह परिसरात शोककळा पसरली आहे. या दुर्घटनेत अमोल लव्हाळे वय २८ वर्षे रा. मस्साजोग ता. केज येथील अविवाहित महावितरण कर्मचाऱ्यांचा जागीच मृत्यू झाला आहे.याघटनेने संपूर्ण गावामध्ये हळहळ व्यक्त होत आहे. विद्युत शॉक लागून मृत्यू झालेल्या कर्मचाऱ्यांला शव्हविच्छदनासाठी केज येथील स्वामी रामानंद तीर्थ शासकीय उपजिल्हा रुग्णालयात नेण्यात आले आहे. अमोल लव्हाळे हा गरीब कुटुंबातील मुलगा होता. त्याच्या पश्चात आई आहे. त्याच्या कुटुंबात फक्त आई आहे.वडील नसल्यामुळे घरातील उदरनिर्वाह करण्यासाठी कोणी नसल्यामुळे महावितरण प्रशासनाने या घटनेचा पंचनामा करून अमोल लव्हाळे यांच्या कुटुंबाला आर्थिक मदत करण्याची मागणी मस्साजोगसह पंचक्रोशीतील मित्र परिवाराकडून होत आहे. अमोल लव्हाळे यांच्या पार्थिवावर मस्साजोग येथे आज सकाळी अंत्यसंस्कार करण्यात येणार आहे.

## घनसावंगी तालुक्यात ओला दुष्काळ जाहीर करण्याची मागणी; पुंगीबजाव मोर्चा

### आठ दिवसांत निर्णय न झाल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा



घनसावंगी /प्रतिनिधी

तालुक्यातील शेतकरी बांधवांवर अतिवृष्टीमुळे मोठ्या प्रमाणावर पिकांचे नुकसान झाले असून शेतकरी संकटात सापडले आहेत. या पार्श्वभूमीवर ओला दुष्काळ जाहीर करा या प्रमुख मागणीसाठी युवा शेतकरी संघर्ष समितीच्या वतीने तहसील कार्यालयावर पुंगीबजाव मोर्चा काढण्यात आला. या मोर्चात तालुक्यातील शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

मोर्चादरम्यान शेतकरी महिला व मुलींच्या हस्ते मा. तहसीलदार श्रीमती वंजारी यांच्यामार्फत राज्याचे मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांना मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले. या निवेदनात शेतकऱ्यांच्या ओल्या दुष्काळाशी संबंधित विविध मागण्यांचा समावेश होता. विशेषत पीक नुकसानीची तात्काळ पाहणी करून मदत जाहीर करावी ओला दुष्काळ घोषित करून शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा द्यावा, शेतकऱ्यांचे कर्ज तात्पुरते स्थगित ठेवावे तसेच तातडीने नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने ठोस भूमिका घ्यावी अशा मागण्या मांडण्यात आल्या.

या प्रसंगी तालुका कृषी अधिकारी श्री.सखाराम पवळ, पोलीस प्रशासन व स्थानिक पत्रकार बांधव उपस्थित होते. शेतकरी बांधवांनी आंदोलनासाठी सहकार्य करणाऱ्या सर्वांचे मनःपूर्वक आभार मानले.युवा शेतकरी संघर्ष समितीच्या वतीने चेतावणी देण्यात आली की जर पुढील आठ दिवसांत शासनाने अतिवृष्टीग्रस्त भागास ओला दुष्काळ घोषित करण्याचा आदेश काढला नाही तर तालुक्यातील शेतकरी मोठ्या प्रमाणावर रस्त्यावर उतरतील आणि तीव्र जनआंदोलन उभारले जाईल.शेतकऱ्यांच्या जगण्याच्या प्रश्नाशी निगडीत असलेल्या या मागणीकडे शासनाने तातडीने लक्ष देणे अत्यावश्यक ठरणार आहे.

## अंबड तालुक्यातील रुई गावातील पाझर तलावाला भगदाड

### जलसंधारण विभागाच्या गलथान कारभारामुळे शेतकऱ्यांचे कोट्यवधींचे नुकसान

अंबड /प्रतिनिधी :-

तालुक्यातील रुई येथील पाझर तलावाला सलग पावसामुळे मोठे भगदाड पडल्याने शेकडो एकर शेती पाण्याखाली गेली आहे. या पाण्यात काढणीस आलेली कापूस, सोयाबीन, मका आदी पिके वाहून गेल्याने शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडले आहेत. विशेष म्हणजे काही शेतकऱ्यांची सुपीक मातीच वाहून गेल्याने त्यांचे कायमस्वरूपी नुकसान झाले आहे.मिळालेल्या माहितीनुसार, हा तलाव १९९७-९८ साली जिल्हा परिषदेच्या जलसंधारण विभागामार्फत बांधण्यात आला होता. त्यानंतर २००७ मध्ये तलावाची धारदाबणीचे काम करण्यात आले. मात्र गेल्या अनेक वर्षांपासून तलावाची आवश्यक देखभाल व दुरुस्ती करण्यात आलेली नाही.

१७ जुलै २०२५ रोजी गावकऱ्यांनी लेखी निवेदनाद्वारे तलाव धोकादायक स्थितीत असल्याचे प्रशासनाला कळवले होते. मात्रसंबंधित अधिकाऱ्यांनी या निवेदनाकडे दुर्लक्ष केले.अखेर सततच्या पावसामुळे तलावाला भगदाड पडले आणि पाण्याचा प्रचंड प्रवाह शेतात शिरला.

या घटनेत विजय राजगुरू, अर्जुन राजगुरू, राम भरपूर, मच्छिंद्र भरपूर, सचिन मुसळे, ईश्वर तारगे, ईश्वर मुसळे, दिलीप राजगुरू, गोवर्धन राजगुरू यांसारख्या अनेक शेतकऱ्यांची शेती



पाण्याखाली गेली आहे.

काढणीस आलेली पिके वाहून गेली असून काही ठिकाणी सुपीक जमीनच नष्ट झाली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना कधीही भरून न येणारे नुकसान झाले आहे. या दुर्घटनेनंतर शेतकऱ्यांनी जलसंधारण विभागाच्या गलथान कारभारावर तीव्र संताप व्यक्त केला आहे. प्रशासनाने वेळीच लक्ष घालून दुरुस्ती केली असती, तर आज इतके मोठे नुकसान टाळता आले असते असे पीडित शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.

याबाबत चौकशी केली असता जलसंधारण विभाग अंबड यांच्याकडून सांगण्यात आले की, या दुरुस्तीच्या कामासाठी विभागाकडे आवश्यक निधीच उपलब्ध नव्हता अशी सबब देण्यात आली आहे.

सध्या रुई परिसरात शेतकरी वर्गात तीव्र चिंता व असंतोष पसरला आहे. शेतकऱ्यांनी तातडीने पंचनामे करून शासनाकडून योग्य ती आर्थिक मदत व भरपाई देण्यात यावी, अशी जोरदार मागणी केली आहे.

## मौजे कवडगांव रस्त्यावरील पुल गेला वाहून; ग्रामस्थांचा आरोप
## निकृष्ट दर्जाच्या कामामुळे निर्माण झाली परिस्थिती

अंबड /प्रतिनिधी

तालुक्यातील मौजे कवडगांव येथे दि.१५ सप्टेंबर रोजी रात्री विजांच्या कडकडाटासह झालेल्या मुसळधार पावसामुळे गावाकडे जाणाऱ्या रस्त्यावरील पुलाचे कठडे गेले वाहून आणि पुल पुर्णपणे फुटल्याने मोठ्या प्रमाणात पुल उखडला आहे.या घटनेमुळे गावकऱ्यांना मोठ्या प्रमाणावर गैरसोय होत असून, गावाचा संपर्क पूर्णपणे तुटला आहे.

ग्रामस्थांनी गंभीर आरोप केला आहे की, केवळ दोन वर्षांपूर्वी मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत बांधण्यात आलेला हा पुल निकृष्ट दर्जाच्या बांधकामामुळे इतक्या कमी कालावधीत वाहून गेला. स्थानिकांनी सांगितले की, कामाच्या वेळी कंत्राटदाराने दर्जाहीन साहित्य वापरले, तर अभियंता व कंत्राटदाराने संगनमताने बोगस पद्धतीने काम केल्याचे स्पष्ट झाले आहे. मुसळधार पावसामुळे या कामाचा पोलखोल झाला आहे.सदर रस्ता व पुलाचे काम वंडर कन्स्ट्रक्शन, छत्रपती संभाजीनगर या कंपनीकडून करण्यात आले होते. तर या प्रकल्पाची जबाबदारी सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंता सुकाळे यांच्यावर होती.मात्र कामाच्या गुणवत्तेकडे पूर्णपणे दुर्लक्ष झाल्याने हा प्रकार घडल्याचा ग्रामस्थांचा ठाम आरोप आहे. सदरील कंत्राटदार यांनी काम मजबूत करुन द्यावे अशी मागणी सरपंच सौ.मनीषा रामकिसन जाधव व तसेच ग्रामस्थ यांच्याकडून करण्यात येत आहे. सुदैवाने या घटनेत जीवितहानी टळली आहे. मात्र



पुल वाहून गेल्यामुळे ग्रामस्थांना अत्यंत मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. गुत्तेदाराने बोगस काम केले असून अभियंत्याने त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले आहे. प्रशासनाने तात्काळ तपास करून दोषींवर कठोर कारवाई करावी आणि गावकऱ्यांच्या सोयीसाठी नवीन व मजबूत पुलाचे बांधकाम करावे.

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
Bureau of Indian Standards
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ
सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर,
सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777
6 x 6.5

## संपादकीय

# लोकशाही, लोकशाही, दार उघड!

शालान्त परीक्षांमुळे मतदानासाठी शाळा उपलब्ध होणार नाहीत, असे सांगितल्यानंतर 'या परीक्षा फेब्रुवारी-मार्चमध्ये होतात, त्यामुळे ही सबब चालणार नाही,' असे न्यायालयाने स्पष्ट केले.

सर्वोच्च न्यायालयाच्या स्पष्ट शब्दांतील आदेशांनाही केराची टोपली दाखवून राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याबाबत चालढकल करणारे राज्य सरकार आणि राज्य निवडणूक आयोग यांना न्यायालयाने कडक शब्दांत फटकारले आहे.

येत्या ३१ जानेवारीपूर्वी कोणत्याही परिस्थितीत या निवडणुका घेण्याचा निर्वाणीचा इशारा न्या. सूर्य कांत आणि न्या. जॉयमाल्या बागची यांच्या खंडपीठाने दिला; त्यामुळे या मुदतीत निवडणुकांची प्रक्रिया पूर्ण करण्यावाचून पर्याय राहिलेला नाही. चार महिन्यांत या निवडणुका घेण्याचा आदेश न्यायालयाने मे महिन्यातच दिला होता; परंतु सरकार आणि निवडणूक आयोग निवांत राहिले. त्यानंतर बुधवारी झालेल्या सुनावणीतही राज्य सरकारने निवडणुका न घेण्याबाबत अडचणी मांडल्या, तेव्हा खंडपीठाने 'न्यायालयाच्या आदेशानुसार निवडणुका घेण्याच्या मुद्द्यावर निष्क्रियता आणि विलंब, हे अक्षमतेचे निदर्शक आहे,' अशा शब्दांत सरकारची कानउघाडणी केली.

वर्षभर अभ्यासाकडे ढुंकूनही न पाहणाऱ्या विद्यार्थ्यांची परीक्षेपूर्वीच्या आठवड्यात अभ्यासाची धांदल उडते, तद्वतच आता केवळ चार महिन्यांतच राज्यातील २९ महानगरपालिका, २६ जिल्हा परिषदा, २८९ पंचायत समित्या आणि २५७ नगरपालिकांच्या निवडणुकांची प्रक्रिया पार पाडण्याची वेळ राज्य सरकार आणि राज्य निवडणूक आयोगावर आली आहे.

करोनाच्या काळात राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पुढे ढकलण्यात आल्या आणि त्यांवर प्रशासकांची नियुक्ती करण्यात आली. पुढे विदर्भातील काही जिल्ह्यांमध्ये इतर मागासवर्ग गटातील (ओबीसी) आरक्षणाच्या मुद्द्यावरून; तसेच मुंबईतील प्रभागसंख्येवरून न्यायालयीन लढाई सुरू झाली. त्यात काही वर्षांचा कालापव्यय झाल्यानंतर ओबीसी आरक्षणाचा मुद्दा अजूनही अनिर्णित असून, न्यायालयाने त्या आरक्षणास सशर्त मान्यता देऊन निवडणूक घेण्याचा आदेश दिला. मात्र, सरकार आणि राज्य निवडणूक आयोगाने वेगाने पावले उचलली नाहीत. या संस्थांमधील प्रभागरचनेचे प्रारूप तयार असून त्यावरील हरकतींवर सुनावणीची प्रक्रिया सुरू आहे. मात्र, प्रत्यक्ष निवडणुका झाल्या नाहीत. त्या पार्श्वभूमीवर झालेल्या ताज्या सुनावणीत राज्य सरकार आणि आयोगाने पुन्हा 'थांब माझ्या बाळाला तीट लावू दे,'च्या सुरात निरनिराळ्या सबबींचा पाढा वाचला.

इलेक्ट्रॉनिक मतदानयंत्रांच्या उपलब्धतेबाबतही प्रतिज्ञापत्र सादर करण्याची सूचना केली. प्रभागरचनेचे काम ३१ ऑक्टोबरपूर्वी पूर्ण करा, असा आदेश देऊन, 'पूर्वीपासून हे मुद्दे ठाऊक असतानाही जाणीवपूर्वक विलंब केला,' असेही न्यायालयाने सरकारला सुनावले.

## टी.सी. हरवला आहे

हिना पि. गफुर शेख वय ३३ वर्षे रा. मोमीनपुरा गेवराई ता. गेवराई जि.बीड यां चा गेवराई शहरात रिक्षातुन तहसीलकडे जाताना माझ्याकडील ६ वी पास झाला आहे.तरी कोणाला सापडला तर खालील क्रमांकावर संपर्क करा
मो.९७६७४२२०३०

# बंजारा आरक्षणासाठी एकाची आत्महत्या

## गेवराई तालुक्यातील तुका नाईक तांडा येथील घटना

गेवराई /प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील तुका नाईक तांडा येथील एका ५५ वर्षीय व्यक्तीने बंजारा समाजाच्या आरक्षणा च्या मागणीसाठी आपल्या घरा जवळील वीज वाहिनीच्या केबलला पकडून आत्महत्या केल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी गेवराई पोलिस ठाण्यात बुधवार दि १७ रोजी आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, गेवराई तालुक्यातील तुका नाईक तांडा येथील लहू धोंडिबा राठोड वय ५५ वर्ष रा. तुकानाईक तांडा पोस्ट खांडवी हे बीड येथे झालेल्या बंजारा समाजाच्या मोर्चामध्ये सहभागी होऊन घरी परत आल्यानंतर बंजारा समाजाला आरक्षण मिळावं हा हेतू त्यांच्या डोक्यात फिरत होता त्यांच्या मुलाला भरपूर शिकून देखील नोकरी लागणार नाही असे विचार त्यांच्या डोक्यात घोळत होते.




दरम्यान बंजारा समाजाला आरक्षण मिळत नसल्यामुळे लहू अस्वस्थ झाले होते. काल दिनांक १६ सप्टे २०२५ वार मंगळवार रोजी सायंकाळी त्यांनी एक चिठ्ठी लिहली त्यामध्ये त्यांनी मी लहू धोडीराम राठोड रा.तुकानाईक तांडा खांडवी असून मी ऊस तोडण्याचे काम करीत आहे माझा मुलगा खूप शिकलेला आहे.तरी आरक्षण नसल्या मुळे त्याला नोकरी लागत नाही म्हणुण मि आत्महत्या करत आहे. अशा प्रकारची चिठ्ठी लिहून

सायंकाळी साडेचार ते पाच च्या सुमारास आपल्या घराजवळील विद्यूत पंपासाठी वीज वाहिनी वरून घेण्यात आलेला केबल वायर हातात धरला. यामध्ये त्यास विजेचा जोरदार धक्का बसल्यामुळे त्याचा जागीच मृत्यू झाला.

या घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी मिळते कमी त्यांना गेवराई येथील उपजिल्हा रुग्णालयांमध्ये दाखल केले मात्र तोपर्यंत ती मयत झाले होते. या घटनेची माहिती गेवराई पोलीस स्टेशनला कळल्यानंतर गेवराई पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस उप निरीक्षक सुरेश पारधी यांनी भेट देऊन पाहणी केली. याप्रकरणी

यांनी दिलेल्या माहितीवरून गेवराई पोलीस ठाण्यात १७ सप्टेंबर वार बुधवार रोजी अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.पुढील तपास साहेब पोलीस उपनिरीक्षक सुरेश पारधी हे करत आहेत.

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई, जि.बीड येथील दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्री. आर.ए.मिसाळ यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ७७५/२०२५**
**नारायण रामभाऊ लाखुटे वरूध्द निरंक**
**(मार्फत - ॲड आर. व्ही. आव्हाड, गेवराई)**

ज्याअर्थी मयत नामे रामभाऊ पि. आबा लाखुटे हे/हया दिनांक २५/८/१९८५ रोजी मौजे उक्कडपिंप्री ता. गेवराई, जि.बीड येथे मयत झाले/झाल्या आहेत. अर्जदार १) नारायण पि. रामभाऊ लाखुटे वय ७५ वर्षे, धंदाः शेती रा.उक्कडपिंप्री, ता. गेवराई, जि. बीड, २) बद्री पि. रामभाऊ लाखुटे वय ६५ वर्षे, धंदाः शेती रा. सदर, ३) मंडुबाई भ्र. हरीषचंद्र काशिद वय-७३वर्षे, धंदाः शेती रा. साक्षळपिप्री ता. जि.बीड, ४) केशरबाई भ्र. बाबासाहेब काशिद वय-६७ वर्षे, धंदाः शेती रा. सदर, यांनी शासकीय/निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जेदारोंच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना संदर मयंत रामभाऊ पि.आबा लाखुटे यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक १८/१०/२०२५ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्यों शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख १९/११/२०२५

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई, जि.बीड येथील दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्री. आर.ए.मिसाळ यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ७६६/२०२५**
**मंगल नारायण राठोड विरूध्द निरंक**
**(मार्फत ॲड आर.एच.राठोड, गेवराई)**

ज्याअर्थी मयत नामे नारायण पि. रमेश राठोड हे/हया दिनांक २४/१/२०२३ रोजी मौजे राजुरीमळा तहत तलवडा ता. गेवराई, जि. बीड येथे मयत झाले/झाल्या आहेत अर्जदार १) मंगल भ्र. नारायण राठोड वय-४५ वर्षे, धंदाः घरकाम व शेती रा. राजुरीमळा तहत तलवडा, ता. गेवराई, जि. बीड, २) रोहित पि. नारायण राठोड वय-२३वर्षे, धंदाः शेती रा. राजुरीमळा तहत तलवडा, ता. गेवराई, जि. बीड, ३) निशा पि. नारायण राठोड वय-२६ वर्षे, धंदाः शिक्षण रा. राजुरीमळा तहत तलवडा, ता. गेवराई, जि. बीड, यांनी शासकीय/ निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत नारायण पि. रमेश राठोड यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ११/०९/२०२५ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख १६/१०/२०२५

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई, जि. बीड येथील दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्री. एस. पी. वानखडे यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ३५९/२०२५**
**बाबुभाई पि. कठुभाई शेख व ईतर विरूध्द निरंक**
**(मार्फत ॲड. एस. के. निकम, गेवराई)**

ज्याअर्थी मयत क. १ नामे कठुभाई बाबामिया शेख हे / हया दिनांक १०/०९/२०१८ रोजी मौजे आगर नांदुर, ता. गेवराई, जि. बीड येथे मयत झाले/झाल्या तसेच मयत क. कठुभाई शेख हे/हया दिनांक २१/०५/२०११ रोजी मौजे आगर नांदुर, ता. गेवराई, जि २ कडुबी बीड येथे मयत झाले / झाल्या तसेच मयत क. दिनांक १२/०८/२०२१ रोजी मौजे आगर नांदुर, ता. गेवराई, जि.बीड येथे मयत झाले / झाल्या ३ नामे रफिक पि. कठुभाई शेख है / हया आहेत. अर्जदार क. १ बाबुभाई पि. कठुभाई शेख, वय- ७७ वर्षे, धंदा - शेती, रा. आगर नांदुर, ता. गेवराई, जि. बीड, २. बिस्मील्लाबी भ्र. रफिक शेख, वय- ४८ वर्षे, धदा - शेती, रा. सदर, ३. शेख युसुफ पि. रफिक, वय- २७ वर्षे, धंदा- शेती, रा. सदर ४. शेख अन्सार पि. रफिक, वय- २५ वर्षे, धंदा- शेती, रा. सदर, ५. दुरेशा भ्र. सुलेमान शेख, वय - ७५ वर्षे, धंदा- घरकाम, रा. विहामांडवा, ता. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर/ औरंगाबाद यांनी शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत १. कभाई बाबामिया शेख, २. कडुबी कठुभाई शेख, ३. रफिक पि. कठुभाई शेख यांचे वारसाने प्रमाणपत्र देण्यात येईल

आज दिनांक रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व शिक्यानिशी दिले.

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

## CHANGE IN NAME

I DECLARED BY THIS PUBLICATION ABOUT CHANGE IN MY NAME
**OLD NAME : GHONGADE VIKAS JIJA**
**CHANGE IN TO MY NEW NAME : GHONGADE VIKAS JIJARAM**
PRESENT ADD: AT.POST. REVKI, TQ.GEVRAI, DIST.BEED
MAHARASHBTRA - 4361127
MO.8459821212

ADVOCATE

**ॲड. गणेश एम कोल्हे**
माऊली नगर, ताकडगांव रोड, गेवराई,
ता. गेवराई, जि. बीड
मो.नं. ९०७५५००६००

दिनांक : १९/०९/२०२५

## कॅव्हेट नोटीस

(Intimation of Cavet Notice U/s. 148 (A)

**प्रति,**

१) **मारोती पि. संमतराव मतकर**
वय - ४८ वर्षे, धंदा - बीअर बार व व्यापार
मो.नं. ९९२३९६०२३५ / ९१३०८८१५५५

२) **आण्णासाहेब पि. संपतराव मतकर**
वय - ४८ वर्षे, धंदा - बीअर बार व व्यापार
रा. पिंपरगव्हाण, ता. जि. बीड.
ह.मु. तुळजाई नगर, ग्रामसेवक कॉलनी जवळ,
नगर रोड, बीड, ता. जि. बीड
मो.नं. ७७९८०९०८१६

माझे अशील नामे संदीपान रामकिसन ढोरमारे, वय - ४९ वर्षे, धंदा -शेती, रा. तळेगांव, ता. जि. बीड. मो.नं. ९६२३७७२७७७ यांनी दिलेल्या माहितीवरुन, कायदेशीर अधिकारावरुन, सुचनेवरुन व दाखवलेल्या कागदपत्रावरुन आपणांस कायदेशीर कॅव्हेट नोटीस खालील प्रमाणे.

१. असे की, उपनिबंधक सहकारी संस्था तालुका बीड तथा सावकारांचे उपनिबंधक तालुका बीड यांचे कार्यालय / न्यायालयातील सावकारी अधिनियम २०१४ चे कलम १६ अन्वये चौकशी निर्णय संचिका क्र. सावकारी/ अहवाल : ढोरमारे विरुध्द मतकर / १६१६ मध्ये गैरअर्जदारा विरुध्द न्याय निर्णय निष्कर्ष आदेश पारित दिनांक २७ मे २०२५ व तदनंतर सावकारांचे जिल्हा निबंधक तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था बीड यांच्या कार्यालयात १२ सप्टेंबर २०२५ रोजी न्याय निर्णय पारित करुन संचिका जा.क्र. सावकारी/तक्रार/ ढोरमारे विरुध्द मतकर व ईतर / २७६६/२५ मध्ये नॉनकॅव्हेटर विरुध्द महाराष्ट्र सावकारी अधिनियम २०१४ कलम ३९ प्रमाणे गुन्हा नोंद करुन कार्यवाही करणे बाबत आदेश निर्गमीत केला असता, सदर प्रकरण मध्ये कुठल्याही प्रकारचे पुनर्निरीक्षण अर्ज अथवा अपील दाखल केल्यास त्या मध्ये कॅव्हेटर यांना संधी व पुरेसा कालावधी उपलब्ध करुन देणे कामी कॅव्हेटरच्या वतीने दिवाणी प्रक्रिया संहितेचे कलम १४८ (ए) प्रमाणे कॅव्हेट नॉन कॅव्हेटर विरुध्द नोंद करणे बाबत खाली दर्शविण्यात आलेल्या कार्यालयामध्ये कॅव्हेट अर्ज कॅव्हेटरने तुमचे म्हणजेच नॉन कॅव्हेटर यांचे विरुध्द खालील दर्शविण्यात आलेल्या कार्यालय / न्यायालया मध्ये कॅव्हेट अर्ज दाखल केलेले आहेत.

१) मा. सहकार आयुक्त निबंधक तथा निबंधक सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य पुणे (सावकारांचे महानिबंधक) पुणे यांचे न्यायालय / कार्यालय

२) मा. सावकारांचे विभागीय सह निबंधक सहकारी संस्था, जुने जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, लातूर यांचे न्यायालय / कार्यालय

२. असे की, सदर कॅव्हेट नोटीस सोबत माझे अशील / कॅव्हेटर यांचे हक्कात पारित केलेल्या न्याय निर्णय प्रत व संबंधीत कार्यालयात दाखल केलेले कॅव्हेट अर्जाची प्रत जोडलेली आहे व त्याची एक प्रत संबंधीत कार्यालया मध्ये कॅव्हेटर अर्जा सोबत दाखल केलेली आहे. करिता दखल घेणे बाबत सदर कायदेशीर नोटीस.

सबब ही कॅव्हेट नोटीस.

**दिनांक : १९/०९/२०२५**
**बीड.**

**कॅव्हेट अर्जदाराचे वतीने विधीज्ञ**
**स्वाक्षरित/-**
**ॲड. गणेश एम. कोल्हे**
जिल्हा व सत्र न्यायालय, बीड.
मो.नं. ९०७५५००६००

**कॅव्हेटर / अर्जदार**
**स्वाक्षरित/-**
**संदीपान रामकिसन ढोरमारे**

# वनविभागाची कारवाई ;काळविटाची शिकार करणाऱ्या एकाला अटक, तीन दिवसांची वनकोठडी

प्रतिनिधी: जाफराबाद हरी भालके

जालना वनविभागाने केलेल्या कारवाईत काळवीट या संरक्षित वन्यप्राण्याची शिकार आणि तस्करी करणाऱ्या एका आरोपीला अटक केली आहे. त्याच्या घरातून काळविटाचे मांस, शिंगे आणि शिकारीसाठी वापरलेली साधने जप्त करण्यात आली आहेत. मिळालेल्या माहितीनुसार जाफराबाद तालुक्यातील गारखेडा गावात संतोष विश्वनाथ काळे नावाचा इसम वन्यप्राणी काळविटाची शिकार आणि तस्करी करत असल्याची गुप्त माहिती वनविभागाला मिळाली होती. या माहितीच्या आधारावर १४ सप्टेंबर रोजी वनविभागाच्या पथकाने संतोष काळेच्या घरावर छापा टाकला. या छाप्यात त्याच्या घरात काळविटाचे मांस ठेवलेला फ्रीज, काळविटाची शिंगे, नायलॉनचे जाळे, सुरी आणि चाकू यांसारखे साहित्य आढळले. वनविभागाने हे सर्व साहित्य जप्त केले.

संतोष विश्वनाथ काळे यांच्यावर वन्यजीव संरक्षण अधिनियम १९७२ चे कलम ९,३९,४०,(२),४४, ४८-,४९,४९(इ),५०,५१ अन्वये वनगुन्हा क्र. थङ-०६/२०२५




दि.१४/०९/२०२५ अन्वये गुन्हा नोंद करुन अटक करण्यात आली.१५ सप्टेंबर रोजी त्याला जाफराबाद येथील प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी यांच्यासमोर हजर करण्यात आले असता न्यायालयाने आरोपीला तीन दिवसांची वनकोठडी सुनावली आहे. या प्रकरणाचा पुढील तपास वनपरिक्षेत्र अधिकारी एन. पी. फुले करत आहेत. ही कारवाई छत्रपती संभाजीनगरचे (प्रा) वनसंरक्षक गजेंद्र हिरे, उपवनसंरक्षक सुवर्णा माने यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. सहाय्यक वनसंरक्षक एस. एन. मुंढे यांच्या नेतृत्वाखालील टीममध्ये वनपरिक्षेत्र अधिकारी एन. पी. फुले, भोकरदनचे वनमंडळ अधिकारी वाय. एम. डोमळे, बदनापुरचे वनपरिमंडळ अधिकारी आर. डी. दुनगहु यांच्यासह वनरक्षकांनी ही कारवाई केली.

# मौजे पराडा येथे अवकाळी पावसाचा तडाखा

## सोलार कंपनीच्या पाट्याचे मोठे नुकसान; शेतकऱ्यांची आर्थिक मदतीची मागणी

अंबड प्रतिनिधी :-जालना जिल्ह्यातील अंबड तालुक्यातील मौजे पराडा येथे सोमवारी (दि. १५ सप्टेंबर २०२५) दुपारी १ ते ४ या वेळेत झालेल्या अतिवृष्टी व अवकाळी पावसामुळे शेतकरी हवालदिल झाले आहेत. अचानक आलेल्या या पावसामुळे गावातील शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले असून गट क्रमांक ६९ मधील शेख जैनुद्दीन शेख रहीमोद्दीन यांच्या ७.५ एचपी क्षमतेच्या कुसुम योजनेतील ऋद्ध सोलार कंपनीच्या पाट्याचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

अवकाळी पावसामुळे पराडा परिसरातील सर्व शेतांमध्ये पाणी साचले. काढणीस आलेली सोयाबीन, कापूस, तूर, मका यांसारखी पिके मोठ्या प्रमाणावर बाधित झाली आहेत. काही ठिकाणी पिके उन्मळून पडली तर काही ठिकाणी पूर्णपणे वाहून गेली. यामुळे शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे.

अचानक झालेल्या या पावसाने शेतकरी वर्गावर दुहेरी संकट कोसळले आहे. एकीकडे काढणीच्या उंबरठ्यावर आलेली पिके पाण्याखाली गेली आहेत, तर दुसरीकडे सोलार पाट्यांचे नुकसान झाल्यामुळे सिंचनाच्या दृष्टीने शेतकऱ्यांची अडचण वाढली आहे.पीडित शेतकऱ्यांनी शासनाकडे तातडीने पंचनामे करून



आर्थिक मदत व भरपाई देण्याची मागणी केली आहे.

अतिवृष्टीमुळे पिके व उपकरणांचे मोठे नुकसान झाले आहे. शासनाने लवकरात लवकर मदत जाहीर करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा अशी मागणी शेतकऱ्याकडून होत आहे.

# बीड नगर पालिकेचे माजी सभापती मोहम्मद इलियास यांचा काँग्रेस प्रवेश



बीड /प्रतिनिधी

काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते माजी मंत्री अशोकराव पाटील साहेब व जिल्हाध्यक्ष राहुल भैय्या सोनवणे यांच्या नेतृत्वात केज येथे बीड शहर नगर पालिकेचे माजी सभापती इलियास मोहम्मद शहा उर्फ इलियास टेलर यांच्यासह मुशर्रफ शेख, साद शेख, सोफियान इलियास शहा यांनी देखील काँग्रेस प्रवेश केला.

यावेळी जिल्हा उपाध्यक्ष प्रवीणकुमार शेप, बीड तालुकाध्यक्ष गणेश दादा बजगुडे, डॉ. चाळक आदी उपस्थित होते.

# गायरान धारकांनी महाधरणे आंदोलनात शक्ती प्रदर्शन करावे – शाहू डोळस

बीड प्रतिनिधी

कसत असलेल्या गायरान जमिनी मुळ कागदपत्रांसह प्रस्ताव दाखल करण्यात आले असतानाही महसूल विभागाच्या गळचेपी धोरणामुळे कसत असलेल्या गायरान धारकाच्या जमिनीं त्यांच्या नावांवर होण्यासाठी वेळ लागत आहे. कसत असलेल्या गायरान जमीनी व नवीन अतिक्रमण जमिनींची प्रलंबीत प्रकरणे निकाली काढून गायरान धारकांना त्यांच्या हक्काच्या जमिनी मिळवून देण्यासाठी युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा रिपाइंचे बीड जिल्हाध्यक्ष पप्पु कागदे यांच्या नेतृत्वाखाली मंगळवार दि. २३ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी ठिकाणी ११:०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालयावर जिल्हा रिपाइंच्या वतीने भव्य महाधरणे आंदोलन आयोजित करण्यात आले आहे. यामध्ये गायरानधारकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून शक्ती प्रदर्शन घडवावे असे आवाहन शाहू डोळस यांनी केले आहे.



भूमिहीन गायरान धारक शेतमजूर व उसतोड कामगार यांना प्रतिमहिना ३००० रुपये पेन्शन (अनुदान) देण्यात यावे. ,गायरान धारकांच्या ७/१२ व ८-अ उताऱ्यावर असणाऱ्या पोट खराब क्षेत्र काढण्यात यावे. आदी प्रमुख मागण्या पदरात पाडून घेण्यासाठी व हक्काच्या जमिनी मिळवून घेण्यासाठी मंगळवार दि. २३ सप्टेंबर २०२५ रोजी बीड तालुक्यातील गायरान धारक, शेतमजूर, घरकुल धारक, रिपाइं पदाधिकारी, कार्यकर्ते व महिला यांनी आपल्या न्याय व हक्कासाठी जिल्हा कार्यालयावर आयोजित करण्यात आलेल्या महाधरणे आंदोलनात हजारोंच्या संख्येने सहभागी होऊन भव्य शक्तीप्रदर्शन करावे असे आवाहन रिपाइं दिव्यांग आघाडीचे बीड जिल्हा अध्यक्ष शाहु डोळस रमेश झोडगे, राजू ढवारे,गंगाराम निसर्गन्ध, गणेश घाटुळ,दिगंबर लोखंडे, सिद्धेश्वर खंडागळे, रामेश्वर वाव्हळकर, द्याणेश्वर रामभाऊ तांबे, महादेव ढगे,प्रवीण सोनावणे,प्रभू माने, धनंजय गिरी, महादेव साबळे, सोमा जाधव, ईश्वर गोगुले, रामराजे कुलगुडे, लक्षमन काळे, बप्पा तांगडे,अभिमान जाधव,अण्णा कदम, गांडगे, भानुदास मजमुले, विशाल माने,आदींनी केले आहे.

# तोतया पोलीस अधिकाऱ्याला गोंदी पोलीसांची अटक

शहागड /प्रतिनिधी

गोंदी पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका इसमाने स्वतःस पोलीस अधिकारी म्हणून सांगत लोकसेवक असल्याची बतावणी केल्याप्रकरणी गोंदी पोलिसांनी तात्काळ कारवाई करून आरोपीस अटक केली आहे.

दि. १५ सप्टेंबर रोजी आरोपी सुरज कडवा राजगुरू (रा. गोंदी, ता. अंबड) यांनी आपल्या मोबाईल क्रमांकावरून एका व्यक्तीस फोन करून मी आशिष खांडेकर, पोलीस ठाणे गोंदीवरून बोलतो अशी खोटी बतावणी केली. प्रत्यक्षात कोणतेही सरकारी किंवा पोलीस पद नसताना आरोपीने अशा प्रकारे स्वतःस लोकसेवक असल्याचे भासवून तोतयागिरी केली.या प्रकरणी गोंदी पोलीस ठाण्यात आरोपीविरुद्ध गुन्हा क्रमांक ३१९/२०२५ नोंद करण्यात आला असून त्याच्यावर भा.न्या.स. २०२३ चे कलम २०४, ३१९(२) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई मा. पोलीस अधीक्षक श्री. अजयकुमार बंसल, मा. अप्पर पोलीस अधीक्षक श्री. आयुष नोपाणी, तसेच मा. उपविभागीय पोलीस अधिकारी अंबड श्री. सिद्धेश्वर धुमाळ यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

कारवाईत सहाय्यक पोलीस निरीक्षक आशिष खांडेकर, पो.उपनिरीक्षक हरिदास जंगले, व पो.कॉ. शाकेर सिद्दिकी यांनी सक्रिय सहभाग नोंदवला. पुढील तपास पो.उपनिरीक्षक श्री. संतोष मुपडे करीत आहेत.

गोंदी पोलीस ठाण्याने सांगितले आहे की, कोणतीही व्यक्ती पोलीस अधिकारी किंवा लोकसेवक असल्याचे सांगून अवैध कृत्य करत असेल पैसे मागत असेल किंवा चुकीची माहिती पसरवत असेल तर त्याच्यावर कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल.

तसेच नागरिकांनी आपल्या परिसरात अशा प्रकारची घटना घडल्यास किंवा संशयास्पद व्यक्तींबाबत माहिती मिळाल्यास तात्काळ नजीकच्या पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा असेही आवाहन करण्यात आले आहे.

# हाडोंग्री येथे शिवैक्य वेदमूर्ती नागनाथ महाराज स्वामींचे शुक्रवारी पाचवा पुण्यस्मरण सोहळा

बीड (प्रतिनिधी) –

श्री. क्षेत्र कपिलधार मन्मथ स्वामी संस्थान मुख्य पूजा पुरोहित शिवैक्य वेदमूर्ती श्री नागनाथ महाराज स्वामी यांचे पाचवे पुण्यस्मरण भाद्रपद कृष्ण त्रयोदशी, शके १९४७, शुक्रवार दि. १९ सप्टेंबर २०२५ रोजी साजरे करण्यात येणार आहे.

या निमित्ताने श्री क्षेत्र शिवकडा मन्मथस्वामी तपोभूमी, हाडोंग्री येथे एकदिवसीय कीर्तन सोहळा व गुरुमाऊलींचे आशिर्वचन होणार आहे.

तसेच भाविक भक्तांसाठी महाप्रसादाचीही व्यवस्था केली आहे.

या कार्यक्रमाची सुरुवात दि. १८ सप्टेंबर २०२५ रोजी रात्री हाडोंग्री भजनी मंडळाच्या वतीने होणाऱ्या संगीत भजन व शिवजागराने होणार आहे.

दि. १९ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजता श्री शि.भ.प. माहेश्वरमुर्ती विश्वनाथ स्वामी(वडवळकर जि.लातूर)
यांचे कीर्तन होईल .

या पुण्यस्मरण सोहळ्यास श्री.ष.ब्र.१०८ गुरुविरुपाक्ष शिवाचार्य महाराज(जहागीरदार मठ संस्थान मानूर मठाधिपती ) व श्री.ष.ब्र डॉ. १०८ राचलिंग शिवाचार्य महाराज (परंडकर बार्शी मठ संस्थान मठाधिपती) हे शिवाचार्य उपस्थित राहणार आहेत.

या सोहळ्यास अधिकाधिक भाविकांनी सहभागी होऊन पुण्यस्मरणाचा लाभ घ्यावा, असे आवाहन स्वामी परिवारातर्फे करण्यात आले आहे.



## कर्मयोगी अंकुशरावजी टोपे यांच्या ८३ व्या जयंती सप्ताहानिमित्त

# मी अनुभवलेले कर्मयोगी या विशेष व्याख्यानाचे आयोजन संपन्न..

जालना/ प्रतिनिधी

अंकुशराव टोपे महाविद्यालय, जालना येथे कर्मयोगी अंकुशराव टोपे साहेब यांच्या ८३ व्या जयंती सप्ताहानिमित्त मी अनुभवलेले कर्मयोगी या विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रमुख व्याख्याते प्रा. कल्याण एखंडे होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस शिक्षण महर्षी कर्मयोगी अंकुशरावजी टोपे साहेब यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून मान्यवरांनी अभिवादन केले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दादासाहेब गजहंस होते.

तर कार्यक्रमास उपप्राचार्य डॉ. संजय पाटील, उपप्राचार्य प्रा. पांडुरंग खोजे, पर्यवेक्षक प्रा. रामप्रसाद भालेकर, कार्यालयीन अधीक्षक श्री. सुरेश चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती होती.



प्रास्ताविक करताना डॉ. संजय पाटील यांनी जयंती सप्ताहाच्या उपक्रमांची रूपरेषा मांडली. त्यांनी साहेबांची कामाची पद्धत अत्यंत शिस्तप्रिय असल्याचे अधोरेखित केले.प्रमुख व्याख्याते प्रा. कल्याण एखंडे यांनी मी अनुभवलेले कर्मयोगी या विषयावर बोलताना टोपे साहेबांच्या सहवासातून मिळालेली संस्कारांची शिदोरी जीवनाला कलाटणी देणारी ठरल्याचे सांगितले.

ते म्हणाले की,साहेब हे चारित्र्यसंपन्न, गुणवत्तेला महत्त्व देणारे, स्वाभिमानी आणि कार्यकर्तृत्वाला अग्रस्थानी मानणारे नेते होत.राजकीय आयुष्यात त्यांनी जि.प. सदस्य, आमदार व खासदार अशी पदे भूषवली.मात्र, संपूर्ण आयुष्यात शिक्षणसंस्था व सहकार क्षेत्रातून हजारो कुटुंबांना उभे राहण्याचे बळ दिले.तसेच साहेबांचे सामाजिक, सांस्कृतिक व कौटुंबिक आयुष्यातील अनुभवही त्यांनी श्रोत्यांसमोर मांडले.अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. दादासाहेब गजहंस यांनी साहेबांची समाजनिष्ठा, उत्तरदायित्व व कार्यातून विद्यार्थ्यांनी प्रेरणा घेण्याचे आवाहन केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन डॉ. संतोष करवंदे यांनी केले.

या व्याख्यानाला कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापक-प्राध्यापिका, विद्यार्थी-विद्यार्थिनी तसेच शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



लोकनेते सुंदररावजी सोळंके नागरी सहकारी पतसंस्था माजलगाव चे चेअरमन पदी श्री.विरेंद्रदादा सोळंके साहेब यांची निवड झाले बद्दल सत्कार करताना साखर कारखान्याचे कार्यकारी संचालक श्री आर.सी.बडगुजर साहेब समवेत श्री डी.एम.वरे जनरल मॅनेजर(आसवनी व उपपदार्थ),श्री रवि देशमुख मुख्य शेतकी अधिकारी,श्री सुरेश लगड सचिव,श्री भोसले ऊस पुरवठा अधिकारी

# सातत्याने समाजसेवा करणाऱ्यांची नोंद समाज ठेवतो –ॲड. अजित देशमुख

धारूर (प्रतिनिधी) हुतात्मा विचार मंच, किल्ले धारूर यांनी धारूर शहरातील प्रतिथयश सामाजिक कार्यकर्त्यांचा मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाचे औचित्य साधून सत्कार केला. अशा प्रकारची कौतुकाची थाप देणे, हे सध्या गरजेचे झाले आहे. हे काम उत्तम आहे, असे प्रतिपादन स्वराज्य जनजागृती परिषदेचे अध्यक्ष ड. अजित एम. देशमुख यांनी केले.

मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या निमित्ताने आयोजित केलेल्या या कार्यक्रमात ड. अजित देशमुख प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. यावेळी ते म्हणाले की, हुतात्मा पापासिंह दिखत आणि हुतात्मा काशिनाथ चिंचाळकर यांच्यासारख्यांनी मराठवाडा मुक्तीसाठी मोठे प्रयत्न केले. त्यांनी दिलेल्या बलिदानाचा वसा कायम रहावा या उद्देशाने धारूर येथील भूमिपुत्रांचा आज सन्मान करण्यात आला.

या वेळी ज्यांना पुरस्कार मिळाला त्यांचे काम सातत्याने चालू आहे. कोणत्याही कामातील सातत्य हेच कार्यकर्त्याला सन्मान मिळवून देत असते. या सर्व सत्कारमूर्तींनी आपापल्या क्षेत्रात प्रचंड मोठे काम केले आहे. त्यामुळे हा गुणगौरव तेवढाच महत्त्वाचा आहे. आज समाजात चांगले काम करणाऱ्यांना कौतुकाची थाप देण्यासाठी समाज पुढे येत नाही. मात्र अशा पुरस्काराच्या माध्यमातून सत्कार मूर्तींची जबाबदारी देखील वाढत असते. त्यामुळे सर्व सत्कारमूर्तींना ड. अजित देशमुख यांनी



शुभेच्छा दिल्या.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अशोक चिद्रवार गुरुजी होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून ड. अजित देशमुख यांच्यासह लक्ष्मणराव चिंचाळकर हे देखील विचार मंचावर उपस्थित होते. प्राचार्य प्रदीप दुबे, अरुण दुबे, डॉक्टर अंबादास गुणाल, डॉक्टर एकनाथ शेळके, इंजि. संतोष दुबे, अभिनय कामाजी, संतोष शिरसाट, प्राचार्य विजयकुमार शिनगारे, इंजि. मनोज उकंडे आणि स्वरूप कंकाळ या मान्यवरांना यावेळी पुरस्कार देऊन गौरवण्यात आले.नगरेश्वर मंदिर, किल्ले धारूरया सभागृहामध्ये हा कार्यक्रम मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त पार पडला. यावेळी प्राध्यापक बाबुराव कुंभार, गोवर्धन मस्के, तुषार पाटील, संदिपान थोरात, बालाजी शितोळे, श्रीराम सिकची सर, शिवाजी पिलाजी, यांच्यासह शहरातील मोठा जनसमुदाय उपस्थित होता.

# गांवदरा येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर शाळेत लोकसहभागातून स्पोर्ट्स गणवेश वाटप

## आयएसओ मानांकन प्राप्त जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांचे क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय यश

धारूर /प्रतिनिधी

गांवदरा येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा ही शाळा गुणवत्ता, शिस्त व नावीन्यपूर्ण उपक्रमांसाठी तालुक्यात एक आगळीवेगळी ओळख निर्माण करत आहे. खडज मानांकन प्राप्त असलेल्या या शाळेतील विद्यार्थी केवळ अभ्यासातच नव्हे, तर क्रीडा क्षेत्रातही लक्षणीय कामगिरी करून शाळेचा आणि गावाचा गौरव वाढवत आहेत.

गेल्या आठवड्यात आयोजित तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धांमध्ये शाळेतील विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धांमध्ये सहभाग घेऊन उत्तम कामगिरी केली.या शाळेतील मुले ही अधिक ऊसतोड मजुरांची मुले आहेत या शाळेत शिक्षण घेतलेले अनेक विद्यार्थी मोठे डॉक्टर,पोलीस,शिक्षक, पी.एस.आय अशा विविध्द पदावर आहेत ही शाळा एक आदर्श शाळा असुन याशाळेत लोकसहभागातून स्पोर्ट्स गणवेशांचे वाटप करण्यात आले.मुख्याध्यापक आणि शिक्षकवर्ग यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करत सांगितले की,विद्यार्थ्यांचे हे यश हे केवळ त्यांच्याच मेहनतीचे नव्हे, तर शिक्षक, पालक आणि ग्रामस्थ यांच्या एकत्रित प्रयत्नांचे फळ आहे. अशा प्रकारेच सर्वांच्या सहकार्याने शाळेचा सर्वांगीण विकास साधता येतो.

विविध स्पर्धांत यश मिळवल्या नंतर गावकऱ्यांनी विद्यार्थ्यांच्या यशाचे



भरभरून अभिनंदन करत आगामी जिल्हास्तरीय व राज्यस्तरीय स्पर्धांसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

शिक्षकवृंदाकडून आभार

स्पोर्ट्स गणवेश वाटप उपक्रमात सहभाग घेऊन आर्थिक तसेच विविध स्वरूपाची मदत करणाऱ्या सर्व ग्रामस्थांचे,पालकांचे व हितचिंतकांचे डॉ.बाबासाहेब आंबेडकर जि.प. उ.प्रा. शाळेच्या शिक्षकवृंदाकडून मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले आहेत.

# जिल्हास्तरीय आविष्कार स्पर्धेत स्वामी विवेकानंद महाविद्यालयाला यश

मंठा /प्रतिनिधी

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, संभाजीनगर यांच्या वतीने आयोजित जिल्हास्तरीय आविष्कार स्पर्धेत मंठा येथील स्वामी विवेकानंद महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी यश मिळवत प्रथम व द्वितीय पारितोषिक पटकावले.

विद्यापीठ दरवर्षी विज्ञानाचा प्रसार आणि विद्यार्थ्यांमध्ये संशोधनाची आवड निर्माण व्हावी, भविष्यात सक्षम शास्त्रज्ञ घडावेत, या उद्देशाने स्पर्धेचे आयोजन करते. यंदा परतूर येथील लालबहादूर शास्त्री महाविद्यालयाने संयोजनाची जबाबदारी पार पाडली. या स्पर्धेत जिल्ह्यातील ३९ महाविद्यालयांतील १०७ विद्यार्थी सहभागी झाले.

स्पर्धेत प्रथम पारितोषिक विज्ञान शाखेचा विद्यार्थी रवी फकीरा ताठे याला मिळाले. त्याने शेतीमध्ये पर्यावरणात्मक आणि आर्थिक शाश्वतेसाठी नॅनो युरियाच्या वापराचा अभ्यास या विषयावर संशोधन प्रकल्प सादर केला. परीक्षक समितीने या प्रयोगाची दखल घेत त्याला पहिला क्रमांक दिला.

द्वितीय पारितोषिक तृतीय वर्षातील विद्यार्थिनी पूजा दत्तात्रय झोल हिने पटकावले. तिने कमी खर्चात पाणी शुद्धीकरण करणारे उपकरण (वॉटर फिल्टर) तयार करून त्याचे सादरीकरण केले. दूषित पाण्यामुळे होणारे आजार कमी करण्यासाठी हा प्रयोग उपयुक्त ठरू शकतो, हे तिने दाखवून दिले.

या दुहेरी यशाबद्दल संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती आशाबाई आकात, उपाध्यक्ष कुणालदादा आकात, सचिव कपिल आकात, कुलगुरू प्रा. डॉ. विजय फुलारी, प्राचार्य डॉ. माणिकराव थीटे यांच्यासह प्राध्यापक व मार्गदर्शक मंडळींनी विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले.

दैनिक समर्थ राजयोग
राजमान्य-राजशक्ती
SAMARTH RAJYOG



# साबला येथे मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनानिमित्त वृक्षारोपण कार्यक्रम संपन्न

केज/प्रतिनिधी

केज तालुक्यातील मौजे साबला येथील ग्रामपंचायत कार्यालया च्या वतीने सय्यद बाशा पीर साहेब दर्गा या ठिकाणी श्री.विठ्ठलराव नागरगोजे गटविकास अधिकारी,पंचायत समिती,केज यांच्या शुभहस्ते वृक्षारोपण करण्यात आले.या कार्यक्रमाच्या अध्यक्षा सरपंच जनाबाई नरहरी काकडे साबला,प्रमुख पाहुणे श्री.अनिलराव चौरे विस्तार अधिकारी, पंचायत समिती केज, श्री.विजयकुमार मस्के विस्तार अधिकारी, पंचायत समिती केज उपसरपंच कचराबाई राजेंद्र सरवदे साबला श्री.तानाजी शिंपले ग्रामपंचायत अधिकारी साबला,श्री.मधुकरराव काकडे माजी सरपंच साबला,मोहजेब इनामदार,मुंबई,श्री. महादेवराव कटारे माजी सरपंच साबला,श्री. हनुमंतराव नाईकनवरे माजी सरपंच साबला, राहुल सरवदे रिपाई आठवले गट जिल्हा उपाध्यक्ष,बीड,वली तांबोळी प्रकल्प समन्वयक एआरटी संस्था,यवतमाळ, श्रीमती ज्योती सांबरे प्रकल्प सहाय्यक एआरटी संस्था यवतमाळ वरील सर्व मान्यवरांच्या हस्ते तसेच साबला येथील नागरिकांच्या उपस्थितीत वृक्षारोपण मोहीम राबविण्यात आली.यावेळी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे श्री.विठ्ठलराव नागरगोजे



गटविकास अधिकारी,पंचायत समिती केज यांनी मार्गदर्शन करताना आपल्या जीवनात वृक्षांचे महत्व काय आहे.तर सावली गार मिळते,स्वच्छ हवा मिळते वृक्ष लागवड करणे ही सध्याकाळाची गरज आहे तसेच त्यांचे संगोपन ही केले पाहिजे

मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियान या अभियानात आपला सहभाग नोंदवावा. त्याच्या माध्यमातून गावातील स्वच्छतेचे महत्व त्यांनी साबला येथील नागरिकांना समजावून सांगितले. ओला कचरा गोळा करून वेगळा ठेवणे व सुका कचरा गोळा करून वेगळा ठेवणे तसेच प्लास्टिकच्या कॅरी बॅग ईतर कुठेही टाकू नये म्हणजे याच्या पासून डास होणार नाहीत.घाण वास येणार नाही जशी आपण आपल्या आरोग्याची घेतो तशी आपण गावातील नागरिकांच्या आरोग्याची सुध्दा घेतलीपाहिजे.गावातील सांडपाण्यासाठी शोष खड्डा तयार करणे त्या पाण्याचा जमिनीत निचरा करणे,आपल्या घराच्या जवळपास घाण न होऊ देणे अशा प्रकारची कामे करण्या साठी गावातील सर्व नागरिकांनी सहभाग नोंदवावा.गावातआरोग्य केंद्र असावे,गावातील तरुण युवकांना तसेच वयोवृद्ध नागरिकांना व्यायाम करणसाठी मोकळे मैदान असावे. गावातील शाळा, अंगणवाडी यांच्या इमारती मजबूत असायला पाहिजेत असे सांगितले.या कार्यक्रमासाठी महिला व पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते.त्यामध्ये नजीर काझी यांनी स्वतःच्या खर्चाने काही वृक्षांची रोपे घेवून दिली आहेत उपस्थित ग्राम पंचायत सदस्य ज्ञानेश्वर पांचाळ,पोपट काकडे, तसेच गणेश कटारे, महादेवकाकडे,बालाजी काकडे,दत्तकुमार काकडे,जालिंदर मुळे, संदिपान काकडे, अभिमान नाईकनवरे, हनुमंत काकडे,अक्षय काकडे,गुलाबराव मुळे, विश्वनाथ नाईकनवरे, लखन राऊत, बाबासाहेब नाईकनवरे, गणेश काकडे,सुदर्शन काकडे,रामहरी काकडे, सिध्देश्वर मुळे,रामेश्वर मुळे,अनिलराव भोसले, महेशकाकडे,काशिनाथ काकडे,रंगनाथ काकडे, गोरख काकडे,सौरभ काकडे,राजेश नाईकनवरे,खैरात काझी,खमरोद्दिनकाझी, लक्ष्मण महाराज काकडे,निहाल काझी, अनंत नाईकनवरे, बाबासाहेब काकडे, संदिपान सरवदे,गणेश सरवदे,संतराम सरवदे तसेच यावेळी गावातील इत्यादी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्र संचालन लक्ष्मण तात्या काकडे यांनी तर प्रास्ताविक आदर्श शिक्षक नरहरी काकडे यांनी तर आभार प्रदर्शन विजयकुमार शिंदे यांनी केले.

# एनडीआरएफ देवदूतांच्या मदतकार्यामुळे पूरग्रस्तांमध्ये कृतज्ञ भावना

## आ.सुरेश धस यांच्या वतीने आभार व्यक्त

आष्टी (प्रतिनिधी)

पाथर्डी तालुक्यातील झालेल्या ढगफुटीमुळे कडी नदीला आलेल्या पुरामुळे कडा, टाकळी आमिया, टाकळीसिंग, सांगवी आष्टी या सर्व गावांमध्ये नदी च्या काठी वास्तव्यास असलेल्या नागरिकांना पाण्याने वेढले असताना एनडीआरएफ च्या देवदूतांनी प्राणांची बाजी लावून तालुक्यातील नागरिकांचे प्राण वाचवले आहेत त्याविषयी सर्व पूरग्रस्तांनी कृतज्ञता व्यक्त केली असून आमदार सुरेश धस यांनी या देवदूतांचे आभार मानले. रविवारी रात्री सोमवारी पहाटे झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतातील पीके वाहुन गेली शेतजमिनी खरडून गेल्या तसेच अनेक नागरिक पुरामध्ये अडकले नद्यांची पाण्याची पातळी एवढी वाढली की पूर परिस्थिती निर्माण झाली. नदीकाठची लोक पुरा मध्ये अडकली गेली त्यांना वाचवण्यासाठी हेलिकॉप्टर द्वारे एअरलिफ्टिंगच्या पर्यायाशिवाय कोणताही पर्याय नसल्यामुळे आमदार सुरेश धस यांनी बीड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन आणि अहिल्यानगरचे जिल्हाधिकारी पंकज आशिया यांच्याशी फोनवर संवाद करून या सर्व पूर परिस्थितीचा आढावा दिला.



मग शासन स्तरावर मोठ्या वेगाने हालचाली झाल्या राज्याचे उपमुख्यमंत्री तथा मदत पुनर्वसन मंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी देखील संपर्क करून आमदार सुरेश धस यांनी अहिल्यानगर येथील आर्मी व एनडीआरएफ च्या टीम ने त्यांना हेलिकॉप्टर साह्याने पुरामध्ये अडकलेल्या लोकांना आपल्या हेलिकॉप्टरच्या द्वारे सुखरूप बाहेर काढण्यात यशस्वी झाले. अशा भयानक परिस्थितीमध्ये शासन दरबारी व महाराष्ट्र सरकारकडे मोठ्या जलद गतीने पाठपुरावा केल्याने आर्मी एनडीआरएफ ची टीम व त्या टीम मधील आर्मीचे व इंडियाच्या जवानांनी मोठ्या हिमतीने अडकलेल्या जवळपास शेकडो लोकांचे प्राण वाचवण्याचे काम या आर्मीतील जवान व इंडिया मधील जवान यांनी काम केल्याने हेलिकॉप्टर च्या द्वारे ज्यावेळी या लोकांना आपल्यासमोर मृत्यू दिसत होता. त्या मृत्यूच्या गुहेतुन बाहेर काढून आपल्या कुटुंबात आणले त्यावेळी त्यांनी आमदार सुरेश आण्णा धस यांच्यापाशी आपली भावना व्यक्त करताना त्यांचे अश्रू अनावर झाले व ते म्हणाले अण्णा तुम्ही आमच्यासाठी खरंच देवदूत बनून आलात आमदार सुरेश अण्णांचे आर्मीच्या जवानांचे देखील त्यांनी हात जोडून आभार मानले. आष्टी तालुक्यामध्ये या झालेल्या अतिवृष्टीमुळे प्रचंड प्रमाणात शेतीचे शेत पिकाचे घरी पडली, कुणाचे शेत वाहून गेले,

# शिक्षक व सेवागौरव पुरस्कारांचे थाटात वितरण

परळी (प्रतिनिधी)

मराठवाडा साहित्य परिषद परळी वैजनाथ शाखेच्या वतीने दरवर्षी देण्यात येणारे आदर्श शिक्षक पुरस्कार, स्व. सुवालालजी वाकेकर स्मृती सेवागौरव पुरस्कार, साहित्य सेवागौरव पुरस्कार तसेच विशेष सेवा कार्यगौरव पुरस्कार येथील वैद्यनाथ कॉलेजच्या सभागृहात त्रिपुरा राज्याचे बांधकाम,आरोग्य, पर्यटन,सांस्कृतिक कार्य विकास सचिव किरणकुमार गित्ते साहेब यांच्या शुभहस्ते वितरित करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी परळी मसापचे अध्यक्ष विजयजी वाकेकर तर प्रमुख पाहुणे म्हणून जवाहर एज्युकेशन सोसायटीचे सचिव दत्ताप्पा इटके गुरुजी,अंबाजोगाई मसापचे अध्यक्ष अमर हबीब, सेवानिवृत्त नायब तहसीलदार बाबुराव रुपनर, परळी मसापचे मार्गदर्शक बाळासाहेब देशमुख,प्राचार्य जगतकर यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या सुरुवातीला स्वामी रामानंद तीर्थ ,डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन, स्व. सुवालालजी वाकेकर यांच्या प्रतिमांचे पूजन करून दीप प्रज्वलन करण्यात आले. मराठवाडा साहित्य परिषदेच्या वतीने शैक्षणिक, सामाजिक व साहित्य क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या श्यामसुंदर मुंडे, अनुप कुमार कुसुमकर, अजय जोशी, मोहन कांदे, मुरलीधर कराड, प्रमोद गादेकर, दिगंबर परसेवाड, रूपाली ढाळे, रंजना जाधव,मंजुषा शिंदे, सुषमा साळेगावकर या शिक्षक शिक्षिकाकांचा आदर्श शिक्षक पुरस्कार २०२५ देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला याशिवाय महाराष्ट्रामध्ये अत्यंत सन्मानाच्या समजल्या जाणाऱ्या स्वर्गीय सुवालालजी वाकेकर स्मृती सेवा गौरव पुरस्कार हा शासकीय सेवेत राहून सामाजिक सलोखा जपणारे आणि उत्कृष्ट सेवा बजावणारे परळीचे सेवानिवृत्त नायब तहसीलदार बाबुरावजी रुपनर तसेच रत्नेश्वर विद्यालयाचे प्राचार्य प्रदीप तुळशीराम मुंडे सर यांना तर यंदाच्या स्व.सुवालालजी वाकेकर स्मृती साहित्य सेवा गौरव पुरस्कारासाठी शेतीमातीसाठी झटणारे आणि बहुआयामी लेखन प्रकार हाताळलेले अंबाजोगाई मसापचे अध्यक्ष अमर हबीब सर यांना वैशिष्ट्यपूर्ण लेखनाबद्दल पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

या कार्यक्रमात उपस्थित पुरस्कारार्थी शिक्षकांना शैक्षणिक चळवळीमध्ये काम करणाऱ्या नागरिकांना आणि सभागृहातील शिक्षणप्रेमी लोकांना त्रिपुरा राज्याचे सचिव किरणकुमार गित्ते यांनी शिक्षण हे मानवी जीवनामध्ये आमुलाग्र बदल घडवण्याचे एकमेव साधन असून उत्कृष्ट समाजनिर्मिती ही शिक्षणाशिवाय अशक्य असून




भावी पिढी सुजाण बनवायची असेल तर सर्वांनीच शिक्षणाकडे सजगतेने पाहून दर्जेदार शिक्षण घेण्यासाठी प्रयत्नशील राहिले पाहिजे आणि असे दर्जेदार शिक्षण हे कितीही तंत्रज्ञान पुढे गेले तरी चांगल्या शिक्षकांशिवाय दर्जेदार शिक्षण अशक्य आहे. म्हणून चांगल्या शिक्षकांचा सन्मान करणे महत्त्वाचे असते. मराठवाडा साहित्य परिषद परळी शाखेने शिक्षकांचा सत्कार करून मोलाची भूमिका पार पाडली आहे. याशिवाय स्वर्गीय सुवालालजी वाकेकर यांनी सामाजिक कार्याची बांधिलकी जोपासली म्हणूनच त्यांच्या नावे विजयजी वाकेकर हे पुरस्कार देत असतात.या अगोदर मला सुद्धा स्वर्गीय सुवालालजी वाकेकर यांच्या स्मृतिप्रतिर्थ पुरस्कार दिला होता, आणि आज माझ्याच हस्ते त्यांच्या स्मृती प्रित्यर्थ पुरस्कार वितरित केले जात आहेत आणि परळी मसापचे अध्यक्ष विजयशेठ वाकेकर हे त्यांच्या कार्याचा वसा पुढे चालवत आहेत याचा मनस्वी आनंद असल्याचे प्रतिपादन माननीय किरणकुमार गीते यांनी केले.या कार्यक्रमातून दत्ताप्पा इटके गुरुजी यांनी मी या जवाहर शिक्षण संस्थेचा सचिव असून या अगोदर याच संस्थेमध्ये स्वर्गीय सुवालालजी वाकेकर हे अध्यक्ष असताना या संस्थेमध्ये आणि नगरपालिकेमध्ये सुद्धा मी त्यांच्यासोबत काम केले असल्याचे सांगितले. तर याही पुढे विधायक कामासाठी आपण विजयशेठ यांनी मासापची धुरा स्वतःच्या खांद्यावर घेतल्यामुळे मराठवाडा साहित्य परिषदेला यापुढेही नियमित मदत करू असे सांगितले.तर माणूस हा आयुष्यभर विद्यार्थी असतो ,सतत नवनवीन काहीतरी शिकले पाहिजे आणि नवीन तंत्रज्ञानातून जीवन समृद्ध केले पाहिजे असे प्रतिपादन स्वर्गीय सुवालालजी वाकेकर स्मृती साहित्य गौरव पुरस्काराचे मानकरी अमर हबीब यांनी केले, अध्यक्षीय समारोपात विजयशेठ वाकेकर यांनी आपल्या वडिलांच्या स्मृतीप्रीत्यर्थ देण्यात येणाऱ्या पुरस्काराशिवाय मराठवाडा साहित्य परिषद चालवताना अध्यक्ष म्हणून जी जबाबदारी वाट्याला येईल ती प्रामाणिक पार पाडून परळीच्या शैक्षणिक आणि साहित्यिक तसेच सांस्कृतिक बळकटी देण्यासाठी आपण सतत प्रयत्नशील असल्याचे सुतोवाच ककेले.

याच कार्यक्रमांमध्ये मान्यवरांच्या शुभहस्ते दैनिक लोकमत तर्फे देण्यात आलेल्या बीडचे भूमिपुत्र पुरस्काराचे मानकरी ठरलेले मंत्रालय मुंबई येथील कक्ष अधिकारी विशालजी राठोड, पद्मावती शिक्षण संस्थेचे सचिव दिपकराव तांदळे, ज्ञानबोधिनी विद्यालयाचे मुख्याध्यापक लक्ष्मण मुंडे सर, केदारी महाराज विद्यालयाचे मुख्याध्यापक चेतन सौंदळे यांचाही मान्यवरांच्या शुभहस्ते यथोचित सन्मान करण्यात आला.

याशिवाय आदर्श शिक्षक पुरस्काराला व आपल्या झालेल्या सत्काराला रंजना जाधव मॅडम व गादेकर सर यांनी प्रतिनिधिक स्वरूपात उत्तर दिले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक परळी मसापचे सचिव डॉ. राजकुमार यल्लावाड यांनी केले तर कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन कवी/शाहीर अनंत मुंडे व बालाजी कांबळे यांनी केले.आभार प्रदर्शन मसापचे उपाध्यक्ष प्राचार्य अरुण पवार यांनी केले तर कार्यक्रम यशस्वीतेसाठी निवड समिती प्रमुख बंडू आघाव,

# माजी आ.भीमराव धोंडे यांचा महापुर नुकसान पाहाणी दौरा पुर्ण

तहसिलदारांना भेटुन तातडीने मदत देण्याची मागणी

आष्टी (प्रतिनिधी)

शिरूर कासार तालुक्यात झालेल्या ढगफुटी व अतिवृष्टीमुळे शेतकरी व व्यापारी बांधवांचे अतोनात नुकसान झाले आहे. अनेक ठिकाणी फळबागा, कांदा चाळ, दुकाने, रस्ते व पूल वाहून गेले आहेत. शेतकऱ्यांचे पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. या आपत्तीग्रस्त भागाला प्रत्यक्ष स्थळी भेट देऊन परिस्थितीची पाहणी केली. शिरूर कासारचे तहसीलदार घोळवे यांची एका शिष्टमंडळासह भेट घेऊन संपूर्ण परिस्थितीचा आढावा दिला. नुकसानीचे



तात्काळ पंचनामे करून नुकसानग्रस्त शेतकरी व व्यापाऱ्यांना मदत द्यावी असे सूचित केले.

यावेळी जि. प. चे माजी सदस्य रामराव खेडकर, जि. प. चे माजी सदस्य रामदास बडे, माजी सभापती प्रकाश बडे, सरपंच ज्ञानदेव केदार, माजी सरपंच भागवत वारे, बबन दहिफळे, राजाभाऊ केदार, युवा नेते संतोष सानप, युवा नेते वैभव बडे, लक्ष्मण जायभाये मान्यवर उपस्थित होते.

# पालकांचे प्रेम मुलांसाठी आवश्यक - प्रा.डॉ. शैलजा बरुरे

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

आंतरभारतीच्या अंबाजोगाई शाखे तर्फे मेरी बात या उपक्रमाच्या १८ व्या भागात स्वामी रामानंद तीर्थ कला आणि वाणिज्य महाविद्यालयातील प्राध्यापिका आणि अंतरभारतीच्या अंबाजोगाई शाखेच्या अध्यक्ष डॉ. शैलजा बरुरे यांनी आपला प्रेरणादायी जीवन प्रवास व्यक्त केला.

आंतरभारतीच्या मेरी बात या उपक्रमांतर्गत, माणूस समजून घेण्याचा एक प्रयत्न केला जातो. या उपक्रमात दर महिन्याच्या दुसऱ्या शनिवारी आंतरभारतीच्या शाखेतील कार्यकर्त्यांस आपला जीवन प्रवास या उपक्रमातून व्यक्त करण्याची संधी मिळते.

डॉ. बरुरे यांचे बालपण लातूरमधील हरंगुळ गावात गेले. त्यांचे वडील कीर्तनकार होते. त्यांच्या पालकांच्या मूल्यांमुळे त्यांना जीवनात प्रगती करण्याची संधी मिळाली. मुलांच्या जीवनात पालकांचे प्रेम महत्त्वाचे



असते. त्यांनी सामाजिक जीवनात जातिवादाचाही सामना केला. त्या अंधश्रद्धेपासून मुक्त जीवनावर आणि देवापेक्षा मानवतेला महत्त्व देण्यावर विश्वास ठेवतात. एकत्र कुटुंबातून मुलांना मूल्ये आणि प्रेम मिळते. पुस्तके हे त्यांचे जीवनातले सर्वोत्तम मित्र आहेत.असे मत त्यांनी आपला जीवन प्रवास मांडताना मत व्यक्त केले.

प्राचार्य बाबासाहेब गोरे सर यांचा मुळे जीवनाला कलाटणी मिळाली. आदर्श शिक्षकांनी योग्य मार्गदर्शन करत त्यांना प्रेरणा दिली, त्या म्हणाल्या की, शिक्षक हे विद्यार्थ्यांच्या जीवनात महत्त्वाची भूमिका बजावतात. प्रा. डॉ. बरुरे हे अंतरभारतीचे अमर हबीब, डॉ. खुरसाळे आणि दगडू लोमटे यांनाही आपले आदर्श मानतात.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन शरद लंगे यांनी केले. ॲड.प्रवीण बजाज, महावीर भगरे, बाबूभाई पठाण, आशा वाघमारे,




**पाटोदा (प्रतिनिधी)**

**जिल्हात सामाजिक परिवर्तन काल दि.१७ सप्टेंबर मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या पार्श्वभूमीवर बीड ते अहिल्यानगर रेल्वेगाडीला मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत हिरवा झेंडा दाखवून शुभारंभ करण्यात आला आहे. मात्र, बीड रेल्वे स्थानकाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्याची मागणी दीर्घकाळापासून प्रलंबित आहे. ही मागणी लवकरात लवकर मान्य व्हावी, यासाठी पाली येथील काल बिंदुसरा धरणात जलसमाधी आंदोलन छेडण्यात आले..! हे आंदोलन मराठा समाजाचे अंजनवती येथील बाळासाहेब मोरे पाटील, अशोक येडे पाटील, सय्यद भाई सादेक, बाबासाहेब सापनकर, आणि सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे यांनी केले आहे हे परिवर्तन दिपक भाई केदार यांच्या भुमिकेमुळे समग्र महाराष्ट्र मध्ये घडत आहे. याचा मनस्वी आनंद होत आहे, मी ऑल इंडिया पँथर सेनेच्या वतीने सर्व बहाद्दर मावळ्यांचे कौतुक व अभिनंदन होत आहे**

# अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या पिकांचे पंचनामे तात्काळ करुन मदत निधी वाटप करावा

भारतीय किसान संघाची मागणी

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

अतिवृष्टीमुळे झालेल्या पिकांचे तात्काळ पंचनामे करून शेतकऱ्यांना तातडीची मदत देण्यात यावी अशी मागणी भारतीय किसान संघाने उपजिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे. यासंदर्भात भारतीय किसान संघाने आज उपजिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की गेल्या एप्रिल महिन्यापासून निसर्गाने शेतकऱ्यांची दैन्या उडवली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांची अवस्था बिकट झालेली आहे. या परिस्थितीत शेतकऱ्यांना दिलासा देणे हे सरकारचे काम असून त्यांना आधार देण्याची ही योग्य वेळ आहे. खरीप हंगामात तयार झालेले सोयाबीन, भात, उडीद, मटकी, कापूस या पिकांच्या शेतमालाच्या खरेदीसाठी एजन्सी नेमून केंद्रावर आलेल्या गुणवत्तेनुसार सर्व दर्जाच्या मालाची चडझ नुसार खरेदी करावी. दर्जा व गुणवत्तेनुसार दर निश्चित करून खरेदी करावी. अशी मागणी केली आहे.




दरम्यान एप्रिल महिन्यापासून अनेक ठिकाणी ढगफुटी व अतिवृष्टी होऊन शेतकऱ्यांच्या पिकाचे अतोनात नुकसान झालेले आहे. त्यांचे सत्वर पंचनामे करावे व नुकसान भरपाई द्यावी. पिक विम्याच्या बाबतीतही गैरप्रकार लक्षात घेऊन राज्य सरकारने१ रुपया प्रीमियम योजना बंद केल्याने प्रामाणिक शेतकरी योजनेपासून वंचित राहीला आहे तो राहता कामा नये. यासाठी तातडीने कारवाई करून नुकसान निश्चिती व पंचनामे याची प्रक्रिया जलद राबवून शेतकऱ्यांच्या खात्यावर लवकरात लवकर रक्कम जमा करावी.ई पिक पाहणी मधील त्रुटी लक्षात घेता ग्रामपंचायत मध्ये शेतकऱ्यांना बोलवून७/१२ पत्रकी नोंद करावी. अथवा ३० सप्टेंबर पर्यंत मुदतवाढ देण्यात यावी, पीक विम्याच्या तरतुदी गतवर्षीप्रमाणे पूर्ववत ठेवणे, कापूस पिकाकरिता सीसीआय मार्फत हमीभाव किसान प द्वारे करून त्याचा पुरावा शेतकऱ्यांना पाठवावा, या मागण्या करण्यात आल्या असून,शेतकऱ्यांना आसमानी संकट आणि सरकारी धोरणाशी झुंजावे लागत असल्याने शेतकऱ्यांमधील असंतोष वाढत चालला आहे. शेतकऱ्यांच्या मागण्या पूर्ण न झाल्यास मोर्चा, धरणे, ठिय्या आंदोलन, करण्याशिवाय पर्याय राहणार नाही असा इशारा या निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

या निवेदनावर भारतीय किसान संघाचे बीड जिल्हाध्यक्ष आप्पाराव यादव, कोषाध्यक्ष भीमराव शिंदे, केज तालुकाध्यक्ष ड दिलीप करपे दिलीप करपे, परळी तालुका अध्यक्ष परमेश्वर राठोड, शिवाजी हेंडगे, नितीन सोनवणे, बालाजी घोडके यांच्या स्वाक्षऱ्या असून याप्रसंगी निवेदन देण्यासाठी भारतीय किसान संघाचे कार्यकर्ते व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

# गरजा कमी ठेवा पण स्वाभिमानाने जगा - ना.पंकजाताई मुंडे

## बीड जिल्हा पत्रकार संघाच्या वतीने शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांचा सत्कार

बीड प्रतिनिधी

संत भगवानबाबांनी एक्कर विका पण शाळा शिका असा संदेश दिला होता. आजच्या युगामध्ये शिक्षण तर महत्वाचे आहेच. परंतु या पिढीतील विद्यार्थ्यांना' गरजा कमी ठेवा आणि स्वाभिमानाने जगा ' असा संदेश देण्याची गरज आहे. परिस्थितीशी समझोता करा परंतु तत्वाशी तडजोड कधीच करु नका.आपल्याकडे कमी पैसे आहेत याची खंत वाटण्यापेक्षा आपल्याकडे जास्त संस्कार आहेत याचा अभिमान वाटू द्या असा मौलिक सल्ला राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धनमंत्री ना.पंकजाताई मुंडे यांनी दिला.

बीड जिल्हा पत्रकार संघाच्या वतीने शिक्षण क्षेत्रात योगदान देणार्या मान्यवरांच्या सत्कार समारंभात त्या बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे हे होते. तर महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्डाचे अध्यक्ष ना.समीर काझी,भाजपचे जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख,भाजपा नेते संतोष हांगे,बीड जिल्हा बँकेचे माजी अध्यक्ष आदित्य सारडा, जेष्ठ नेते नवनाथ शिराळे, अल्पसंख्यांक आघाडीचे नेते सलीम जहाँगीर, शहराध्यक्ष अशोक लोढा, संपादक वैभव स्वामी, संपादक बालाजी तोंडे यांचीही विशेष उपस्थिती होती.

पत्रकार संघाच्या वतीने कला, क्रीडा, संगीत,नाट्य, संस्कृत,वेद,मदरसा, वक्तृत्व, प्रशासन,बुद्धिबळ,कौशल्य विकास, योग प्रशिक्षण,अबॅकस, आश्रमशाळा, मतीमंद शाळा आणि सीबीएससी, इंग्रजी शाळा यासह आदर्श शिक्षणसंस्था,आदर्श शाळा,आदर्श शिक्षक पतसंस्था, सामाजिक सहभागातून विकसित झालेली शाळा अशा वैविध्यपुर्ण शैक्षणिक पुरस्कारांचे वितरण पंकजाताईंच्या हस्ते करण्यात आले.

या कार्यक्रमात बोलतांना ना. पंकजाताई म्हणाल्या की, माझेही शालेय शिक्षण परळीमध्ये झाले.पहिलीच्या वर्गात असताना विद्यार्थ्यांना फरशीवर बसावे लागायचे. हे पाहिल्यानंतर स्व.मुंडे साहेबांनी आमच्या शाळेतील सर्व वर्गात





मुलांना बसण्यासाठी आसन पट्ट्यांची व्यवस्था केली होती याची आठवण ताईंनी सांगितली. जीवनामध्ये कितीही मोठ्या पदापर्यंत गेले तरी मी माझ्या शालेय जीवनातील शिक्षकांना कधीही विसरु शकणार नाही. कारण त्यांनीच खर्या अर्थाने माझा पाया भक्कम केला असल्याचे ताई म्हणाल्या. घरात रा.स्व.संघाचे विचार असल्यामुळे आई-वडिलांनी शक्य असतानाही इंग्रजी शाळेत न पाठवता जिल्हा परिषदेच्या मराठी शाळेत आम्हा तीनही बहिणींना प्रवेश दिला होता.संत भगवानबाबांनी एक्कर विका पण शाळा शिका हा संदेश त्या काळात दिला. माझे आजोबा, मामा, मावशी,काका हे सर्वजण शिक्षक होते. त्यामुळे शिक्षणाचे महत्व आजोळच्या वंश परंपरेने आपोआप कळाले होते.आता काळ खुप बदलला आहे. शिक्षण क्षेत्रातील स्पर्धा पराकोटीची वाढली आहे. साधन सुविधांना नको तेव्हढे महत्व आले आहे. अशा वेळी सधन असणे आणि समृध्द असणे यातला मुलभूत फरक आजच्या पालकांनी आणि विद्यार्थ्यांनी समजून घेण्याची आवश्यकता त्यांनी प्रतिपादित केली.आई-वडिलांनी चांगल्या किंमतीचा मोबाईल घेवून दिला नाही म्हणून आत्महत्ये सारखे पाऊल उचलणारे मुलं पाहिल्यानंतर मन व्यथित होते.आपल्याकडे एक वेळ पैसा कमी असला तरी चालेल परंतु संस्काराचे धन मात्र खुप असले पाहिजे.सधन असण्यापेक्षा समृध्द असण्याचा अभिमान वाटला पाहिजे असे पंकजाताईंनी सांगितले.मुलांना खरोखर शिस्तीचे धडे द्यायचे असतील तर त्यांना पर्यावरणाशी समरस व्हायला शिकवा असेही त्यांना आवर्जुन सांगितले.कार्यक्रमाचे सुत्रसंचालन बीड जिल्हा पत्रकार संघाचे उपाध्यक्ष प्रतिक कांबळे यांनी केले.तर प्रास्ताविक संयोजन समितीचे अध्यक्ष नितीन क्षीरसागर यांनी केले.

### यांचा झाला सन्मान

गणेश मैड, मारुती पठाडे,संतोष दाणी, सौ.रचना सचिन जाधवर, सुशील उचले ,दत्तात्रय क्षीरसागर,वेदमूर्ती अमोलशास्त्री जोशी, गंगाधर देशमुख , सौ.दीप्ती देशमुख, राधा तांबे,धर्मनाथ शिंदे, कल्पना मुंडे,सौ.शीतल काळदाते, प्रा.दिनकर प्रभाकर थोरात,मौलाना अब्दुल हादी ,डॉ. अशोक सखाराम घोडके , सुशील दिनेशराव पवार,अंजली खोबरे,प्रा.भालचंद्र देशमुख,दिलीप मुरलीधर कुलकर्णी,सौ. ज्ञानेश्वरी पवन घाडगे,सौ. श्रद्धा पिंगळे (धांडे),सौ.मैथिली मिरगणे,सौ. दक्ष दयाराम वानखेडे,बाळासाहेब कळसाने, अमर रामचंद्र पुरी,प्रा.बिभीषण चाटे,,देविदास डोळे,शरद शेजाळ,लक्ष्मीकांत दोडके,गिरीश भावले,सुनील फुलचंद मुंडे यांना पुरस्कार देवून गौरविण्यात आले.

# पंतप्रधान नरेंद्र मोदींच संपूर्ण आयुष्य गरिबाच्या कल्याणा साठीच

## माय माउलीनी स्व:ताच्या अरोग्याची काळजी घ्यावी-ना पंकजाताई मुंडे

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आयुष्यभर प्रचंड संघर्ष करून गरीब कल्याणाचा ध्यास घेतला आहे. त्यांच्या आयुष्याची सुरुवात चहा विकणाऱ्या साध्या परिस्थितीतून झाली. मायमाऊलींच्या दु:खाशी जवळून परिचय झाल्यामुळेच आज ते देश चालविताना गरीब आणि वंचित कल्याणाला सर्वाधिक प्राधान्य देतात, असे प्रतिपादन राज्याच्या पशुसंवर्धन पर्यावरण प्रदुषण नियंत्रण मंत्री पंकजा गोपीनाथ मुंडे यांनी केले.

केज विधानसभा मतदारसंघात आमदार सौ. नमिताताई मुंदडा यांच्या मार्गदर्शनाखाली पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त सेवा पंधरवड्याच्या कार्यक्रमांतर्गत मंडी बाजार येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात आयोजित भव्य आरोग्य तपासणी शिबिराचे उद्घाटन मंत्री मुंडे यांच्या हस्ते झाले.

### महिलांच्या आरोग्याचा प्रश्न जिव्हाळ्याचा

या प्रसंगी पंकजा मुंडे म्हणाल्या, महिलांनी आपल्या आरोग्याकडे विशेष लक्ष द्यायला हवे. कितीही पैसा असला तरी खरे धन म्हणजे चांगले आरोग्य. दुखणी अंगावर न काढता वेळेत उपचार घ्यावेत, हीच खरी संपत्ती आहे.त्यांनी पुढे सांगितले की, बीड जिल्ह्यात यापूर्वी आरोग्य तपासणी यज्ञ राबवले गेले असून त्यातून कॅन्सरसारख्या आजारांचे वेळेत निदान झाले. त्यामुळे ग्रामीण माता-माउलींच्या आरोग्यासाठी नियमित तपासणी करणे अत्यंत गरजेचे आहे.

### व्यासपीठावरील मान्यवर

कार्यक्रमाचे अध्यक्ष आमदार सौ. नमिता मुंदडा होते. व्यासपीठावर युवा नेते अक्षय मुंदडा, रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. धपाटे, अधीक्षक डॉ. राकेश जाधव, तालुका आरोग्य



अधिकारी डॉ. श्री बालासाहेब लोमटे, डॉ. चव्हाण, भाजपाचे प्रदेश प्रवक्ते राम कुलकर्णी, संजय गंभीरे, भगवान केदार, सुनील आबा गलांडे, गणेश कराड, हिंदूलाल आबा काकडे, कमलाकर कोपले, शेख रहीम, डॉ. वासुदेव नेहरकर आदी मान्यवर उपस्थित होते.

### समाजकारणाचा संकल्प

प्रास्ताविक करताना युवा नेते अक्षय मुंदडा म्हणाले की, कॅन्सरमुळे माझ्या आईचे निधन झाले. त्या दुःखद प्रसंगामुळे ग्रामीण माता-माउल्यांसाठी आरोग्य तपासणी शिबिर घेण्याचा संकल्प केला आहे. जयवंती नदी स्वच्छतेसाठी पंकजा ताईंकडून निधी मिळावा, अशी मागणी त्यांनी यावेळी केली.

### सेवा उपक्रमांतून गोरगरिबांना मदत

आमदार नमिताताई मुंदडा म्हणाल्या की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त भाजपाकडून राबवले जाणारे सेवा सप्ताहाचे सर्व कार्यक्रम आमच्या मतदारसंघातही हाती घेतले असून त्यातून खऱ्या अर्थाने गोरगरिबांना मदत होते.

### ७०० पेक्षा अधिक तपासण्या

या शिबिरात तब्बल ७०० हून अधिक महिलांनी आरोग्य तपासणी करून घेतली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वैजनाथ देशमुख यांनी केले. तर यशस्वीतेसाठी ज्येष्ठ नेते नंदकिशोर मुंदडा यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.दरम्यान सेवा पंधरवाडा निमित्त रुग्णालय परिसरात मंत्री महोदय आणि आमदार यांच्या उपस्थितीत वृक्षारोपणही करण्यात आल

# जिवाची वाडी येथील शिक्षक हनुमंत चौरे यांची बदली झाल्यामुळे निरोप समारंभ संपन्न



केज/प्रतिनिधी

दि.१८ सप्टेंबर रोजी केज तालुक्यातील जीवाचीवाडी येथील जि.प.प्रा.शाळा एडका वस्ती या शाळेतून हनुमंत चौरे यांची बदली झाली असून त्यांनी दि.१ जुलै २००४ ते दि.१८ सप्टेंबर २०२५ पर्यंत म्हणजे २०-२१ वर्ष या जिल्हा परिषद शाळा एडका वस्ती येथे शैक्षणिक कार्य केले.त्यांनी गावातील एक नागरिक सोडून शिक्षक कसा असावा हे त्यांच्या शिक्षक वृतीतून अनेक वेळी गावकऱ्यांनी अनूभवले आहे.असे शिक्षक प्रत्येक शाळेवर असावेत म्हणजे शिक्षण क्षेत्रातील दर्जा उंचावेल

आणि विद्यार्थ्यांना शिक्षण क्षेत्रात आवड निर्माण होईल व विद्यार्थ्यांना त्यांच्या भविष्यासाठी योग्य पाया उभारलेला दिसेल हनुमंत चौरे सर यांच्या निरोप समारंभ नाही तर दु:ख म्हणावे लागेल. कारण शिक्षक काय असतो हे त्यांनी विद्यार्थ्यांना नाही तर तेथील नागरीकांना देखिल त्याची जाणीव करून दिली.आज आम्ही चांगल्या शिक्षकाला निरोप देतोय हे दु:ख आहे पण त्यांनी केलेली कामगिरी हि अतुलनीय आहे.हनुमंत चौरे सर यांनी मुलांना दिलेली शिक्षण रुपी विद्या त्याबद्दल आम्ही तुमचे ऋणी आहोत. आपले कार्य सदैव विस्मरणीय राहील असे भावनीक उद्गार एडका वस्ती वरील पालकांनी यावेळी व्यक्त केले.

# मुख्याध्यापक एच . कांगणे, डोरले सर, राठोड सर,यांचा निरोप समारंभ सत्कार संपन्न

वडवणी (प्रतिनिधी)

आज वडवणी येथील जिल्हा परिषद प्राथमिक रामबाग शाळा आदर्श मुख्याध्यापक एच.कांगणे सर , एम.डोरले सर, राठोड सर, जाधव मॅडम,जाधवर मॅडम,राख मॅडम ,माने मॅडम , गव्हाणे मॅडम यांची ऑनलाईन संगणकीय बदली झाल्याने त्यांना आज शालेय व्यवस्थापण समिती जिल्हा परिषद प्राथमिक शाळा रामबाग वडवणी च्या वतीने तसेच पत्रकार श्री शंकरजी झाडे यांना दैनिक समर्थ राजयोंग चा उत्कृष्ट पत्रकार प्रतिनिधी पुरस्कार मिळाल्याबद्दल शालेय व्यवस्थापण समितीचे अध्यक्ष गणेश दादा टकले, कुंभार मॅडम, उपाध्यक्ष श्यामभाऊ उजगरे, सदस्य गुरुप्रसाद रेडेकर,मछिंद्र खाडे, जालिंदर चिनके, नंदकुमार कुरकूटे, दत्तात्रय फासे,तसेच सर्व शाळेतील विध्यार्थी च्या वतीने शाल, श्रीफळ,पुष्प गुच्छ देऊन सत्कार करण्यात आला आला.यावेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डोरले सर यांनी केले.प्रास्ताविक मनोगत माने मॅडम यांनी केले . राठोड सर यांनी मनोगत व्यक्त करताना विद्यार्थी नी



आम्ही या शाळेत गेले सात ते आठ व वर्षांपासून विध्यार्थी ना शिक्षण देण्याचे काम करतोय तरी पालकांनी कमीत कमी पंधरा दिवसांनी तरी शाळेत येऊन शिक्षकांची भेट घेऊन आपल्या पाल्याची शिक्षणाची विचार पुस केली पाहिजे.त्यांची गुणवत्ता तपासणी पाहिजे.आमच्या कडून शिक्षण घेतलेल्या विध्यार्थी हा भविष्यात एक मोठा अधिकारी, झाल्याशिवाय राहणार नाही.नक्कीच उंच पदावर जाईल.तसेच मुख्याध्यापक कांगणे सर यांनी आपले विचार व्यक्त करताना शालेय शिक्षण समिती व पालकांनी जिल्हा परिषद रामबाग शाळेसाठी खुप सहकार्य केले आहे.लवकरात लवकर ही शाळा नवीन इमारतीत जाईल अशी अपेक्षा केली.सर्व शिक्षक, शिक्षकांनी आजपर्यंत सहकार्य केल्याबद्दल त्यांचे आभार मानले.अध्यक्ष गणेश टकले यांनी सत्कार प्रसंगी मनोगत व्यक्त करताना म्हटले की पत्रकार शंकरराव झाडे हे एक चळवळ तील व्यक्ती महत्व असलेले पत्रकार आहेत.त्यांनी पत्रकारिता, सामाजिक ग्राहक चळवळ क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेले आहे.त्याकरिता त्यांनां दैनिक समर्थ राजयोग च्या वतीने उत्कृष्ट पत्रकार प्रतिनिधी पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले त्याबद्दल चे अभिनंदन व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. तसेच सर्व शिक्षकांना निरोप देताना आश्रू अनवर झाले.त्यांचे मन दाटुन आले.यावेळी आपले शिक्षक आपलेला सोडून दुसरीकडे जात आहेत म्हणून विध्यार्थी, विध्यार्थी नी भेट वस्तू दिल्या.विध्यार्थी भावूक झाले होते.

# आवडत्या शिक्षकांना निरोप : विद्यार्थ्यांच्या डोळ्यांत पाणी, गावकऱ्यांचा अभिमान व्यक्त

## सोनीमोहा जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत भावनिक निरोप समारंभ

धारूर (प्रतिनिधी)

धारूर तालुक्यातील सोनीमोहा जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत गुरुवारी भावनिक वातावरणात निरोप समारंभ पार पडला. मुख्याध्यापकांसह सात शिक्षकांची बदली झाल्याने शाळा व्यवस्थापन समिती, पालक व ग्रामस्थांच्या वतीने मोठ्या उत्साहात हा समारंभ आयोजित करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी सरपंच सुरेंद्र तोंडे होते. यावेळी शाळा स्थापन समिती अध्यक्ष अनिल तोंडे, सरपंच राहुल तोंडे, संदिपान तोंडे ,समिती सदस्य परमेश्वर राऊत, गणेश तोंडे, रघुनाथ तोंडे, सुनील तोंडे, डॉ. कागणे यांच्यासह ग्रामस्थ, पालक व मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

निरोपाच्या प्रसंगी





मुख्याध्यापक श्रीराम सिकची, शिक्षक मकरध्वज आंधळे, शेषनारायण घोळवे, सौ. कल्पना साळवे, स्वामी, श्रीमंदे आणि निर्मळ यांचा शाल-श्रीफळ, पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. सत्कार स्वीकृतीच्या वेळी शिक्षकांसह उपस्थितांचेही डोळे पाणावले.

वक्त्यांनी आपल्या मनोगतात शिक्षकांनी गावात दिलेल्या शैक्षणिक आणि सामाजिक योगदानाचा गौरव केला. गेल्या काही वर्षांत या शिक्षकांनी विद्यार्थ्यांमध्ये ज्ञानाबरोबरच चारित्र्य, संस्कार व सामाजिक जाणीवा रुजविल्या. शाळेची गुणवत्ता उंचावण्यात त्यांनी मोठे योगदान दिले असल्याचे मान्यवरांनी नमूद केले.

विद्यार्थ्यांसाठी हा क्षण अत्यंत वेदनादायी ठरला. आम्हाला सोडून जाऊ नका असा आक्रोश करत मुलांनी टाहो फोडला. अनेक विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या पायाला स्पर्श करून निरोप दिला. संपूर्ण शाळा भावनिक अश्रूंनी ओथंबून गेली होती.गावकऱ्यांनी शाळेच्या आवारापासून ते गावाच्या वेशीपर्यंत शिक्षकांचा निरोप काढला. गावात अनेक पिढ्या घडवणारे शिक्षक आमचा अभिमान आहेत, अशा भावना ग्रामस्थांनी व्यक्त केल्या.सोनीमोहा शाळेत आयोजित हा निरोप समारंभ ग्रामस्थ, पालक व विद्यार्थ्यांच्या उपस्थितीमुळे संस्मरणीय ठरला. शिक्षकांच्या सेवाभावी कार्याची गावकऱ्यांनी पुन्हा उजळणी करत त्यांच्या भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या

# शेतकऱ्यांनी 'तार कुंपण योजना'चा लाभ घ्यावा

## भाऊसाहेब भवर, अनिल कातवटे, किशोर नागरगोजे यांचे आवाहन

पाटोदा ।प्रतिनिधी

शेतकऱ्यांच्या शेतीचे वन्यप्राण्यांपासून व चोरीपासून संरक्षण करण्यासाठी शासनाने राबविलेली शेतासाठी तार कुंपण योजना ही अत्यंत उपयुक्त योजना असून पाटोदा तालुक्यातील सर्व शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन अंमळनेर जिल्हा परिषद गटाचेनेते भाऊसाहेब भवर,अनिल कातवटे व किशोर नागरगोजे यांनी केले आहे. या योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना तब्बल ९० टक्के अनुदान मिळणार असून त्यामुळे शेतांचे संरक्षण, उत्पादनवाढ व आर्थिक बोजा कमी होणार आहे. या योजनेचे



फायदे पिकांचे वन्य प्राण्यांपासून संरक्षण,शेतातील नुकसान कमी होऊन उत्पादन वाढ, पिकांचे चोरी व इतर नुकसान टळणार यासाठी लागणारे आवश्यक कागदपत्रे शेतकरी ओळख क्रमांक,आधार कार्ड इच्छुक शेतकऱ्यांनी आपल्या श्रेयश डिजिटल पंचायत समिती कॉम्प्लेक्स पाटोदा यांच्याकडे संपर्क साधावा असे आवाहन अमळनेर जिल्हा परिषद गटाचेनेते

# महंत श्री.महादेव महाराज बोराडे शास्त्री यांचा जगद्गुरू सेवा भूषण पुरस्काराने गौरव

केज/प्रतिनिधी

रामानंद मिशन ट्रस्ट, पुणे यांच्या वतीने प्रदान करण्यात येणारा प्रतिष्ठेचा जगद्गुरू सेवा भूषण पुरस्कार यावर्षी केज तालुक्यातील श्रीक्षेत्र संत तुकोबाराय पावनधाम संस्थानचे संस्थापक अध्यक्ष महंत ह.भ.प.श्री.महादेव महाराज बोराडे शास्त्री यांना प्रदान करण्यात आला.हा पुरस्कार सोहळा पुणे येथे अत्यंत उत्साहात व आध्यात्मिक वातावरणात पारपडला. श्री.ह.भ.प.भावार्थ महाराज देखणे विश्वस्त श्री.संतज्ञानेश्वर महाराज संस्थान समिती,श्रीक्षेत्र आळंदी यांच्या शुभहस्ते हा पुरस्कार महंत ह.भ.प.श्री.महादेव महाराज बोराडे शास्त्री यांना प्रदान करण्यात आला.समाजप्रबोधन, संतवाङ्मय





प्रचार-प्रसार, अध्यात्म व सेवाभावी कार्यातील त्यांच्या उल्लेखनीय योगदानाची दखल घेऊन हापुरस्कार देण्यात आला असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

या सोहळ्याला अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभली.त्यामध्ये श्री.पं.विशालजी कशाळकर गुरूजी, श्री.पं.रघुनाथजी खंडाळकर,नगरसेवक श्री.युवराज बेलदरे, श्री.आर.के.रांजणे, प्रा.सचिनजी डिंबळे, प्रा.गणेश महाराज भगत,श्री.प्रशांत निगडे आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित मान्यवरांनी महादेव महाराजांच्यासमाजसेवा,अध्यात्मिक कार्यआणि गुरुकुल परंपरेतील सातत्यपूर्ण योगदानाचे कौतुक केले.

# स्वामी विवेकानंद शाळेतील चि. वेदांत सुरवसेचे कुराश नॅशनल चॅम्पियनशीपमध्ये घवघवीत यश

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

रायपूर ( छत्तीसगड ) येथे संपन्न झालेल्या राष्ट्रीय कुराश स्पर्धेमध्ये स्वामी विवेकानंद शाळेतील चि. वेदांत विवेक सुरवसे याने ब्राँझ मेडल मिळवले आहे. या स्पर्धेत २५ मेडल घेऊन महाराष्ट्र राज्यास चॅम्पियनशिप मिळाली ही सर्वांसाठी अत्यंत अभिमानास्पद गोष्ट आहे. विशेष म्हणजे यात बीड जिल्हा कुराश असोसिएशनने घवघवीत यश संपादन केल्यानेच हे शक्य झाले. या स्पर्धेमध्ये बीड जिल्हा कुराश असोसिएशनचे ४ विद्यार्थी सहभागी झाले होते. त्यामध्ये ४५ किलो वजनगटाखाली स्वामी विवेकानंद शाळेचा इयत्ता आठवीतील विद्यार्थी चि. वेदांत विवेक सुरवसे यांने राष्ट्रीय स्पर्धेमध्ये ब्रांझ मेडल घेऊन बीड



जिल्ह्याचे नाव उंचावर नेले आहे. त्याबद्दल

नवक्षितीज बहुउद्देशीय शिक्षण संस्थेच्या अध्यक्ष व मुख्याध्यापिका स्वरूपाताई डिग्रसकर, संस्थेचे सचिव श्री. संतोष दादा कुलकर्णी, क्रिडाशिक्षक अंकुश दादा गायकवाड तसेच सर्व स्वामी विवेकानंद परिवार, पालक व विद्यार्थी मित्र यांनी अभिनंदन व कौतुक केले आहे.

# 'बीएसएनएल'च्या सल्लागार समितीवर प्रकाश जेधे यांची नियुक्ती

## खा. बजरंग सोनवणे निष्ठावंत कार्यकर्त्याला न्याय दिला

वडवणी (प्रतिनिधी)

केंद्र सरकारच्या 'भारत संचार निगम लिमिटेड' च्या(इडछङ) सल्लागार समिती(-वींळीू ऊाळीं-ींशश) सदस्य पदी प्रकाश श्रीराम जेधे यांची नियुक्ती करण्यात आली आहे 'बीएसएनएल'च्या संचालक उर्वशी संघवान यांनी ही नियुक्ती केल्याचे पत्राद्वारे कळवले आहे. सदरील नियुक्ती ही बीड जिल्ह्याचे लोकप्रिय खा. बजरंग सोनवणे यांच्या शिफारशीवरून करण्यात



आलेली आहे. या नोकरीमुळे फोडणी तालुक्यातून त्यांचे कौतुक होत आहे

बाहेगव्हाण या गावाचे रहिवासी असलेले अत्यंत प्रतिकूल परिस्थितीमध्ये त्यांनी या अगोदरही शरद पवार साहेबांच्या राष्ट्रवादीचे एकनिष्ठपणेने काम केले आहे कोणतीही निवडणूक असो राष्ट्रवादी पक्षचे ते पहिल्यापासून एकनिष्ठ कार्यकर्ते म्हणून त्यांच्या त्यांची ओळख आहे राष्ट्रवादी काँग्रेस फुटुन दोन गट पडले तरी त्यांनी शरद पवार साहेबांचे राष्ट्रवादी सोबत एकनिष्ठणे राहिले गेल्या लोकसभा निवडणुकीत त्यांनी राष्ट्रवादी शरद पवार गटाचे उमेदवार बजरंग सोनवणे यांचे त्यांनी एकनिष्ठेने काम केले होते त्याचेच फळ म्हणून खा.बजरंग सोनवणे यांनी प्र.प्रकाश जेधे यांच्यावर विश्वास दाखवत त्यांची बीएसएनएलच्या सदस्यदी नियुक्ती केली आहे प्रकाश जेधे हे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरचंद्र पवार पक्षा)चे सक्रिय कार्यकर्ते असून खा. बजरंग सोनवणे यांचे खंदे समर्थक आहेत. प्रकाश जेधे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या (शरचंद्र पवार) वतीने लढवल्या जाणाऱ्या सर्व निवडणुकांमध्ये व संघटनात्मक बांधणीत महत्त्वाची भूमिका बजावलेली आहे. प्रकाश जेधे यांनी यापूर्वी वडवणी तालुका रोजगार हमी योजना समितीच्या सदस्य पदी ही काम केलेले आहे. सदरील नियुक्ती बद्दल प्रकाश जेधे यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

# जि.प.प्रा.शाळा गांजपूर येथे मीना जाधव यांचा विद्यार्थ्यांना भावनिक निरोप



केज/प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील धारूर तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा गांजपूर येथीलशिक्षिका श्रीमती मीना जाधव यांची बदली झाल्याने शाळेत निरोप समारंभ पार पडला.शेवटच्या दिवशी श्रीमती जाधव यांनी आपल्या विद्यार्थ्यांना स्माईल बॉल देत गोड आठवणी दिल्या तसेच प्रत्येक विद्यार्थ्यांना चॉकलेट वाटप केले.या अनोख्या पद्धतीने निरोप घेतल्याने विद्यार्थी आनंदित झाले.आपल्या आवडत्या शिक्षिकेचा निरोप घेताना विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर हसू होते,परंतु मनामनात भावनिक ओलावा दाटून आला.

श्रीमती जाधव यांनी शिक्षक म्हणून केलेल्या कार्याचा विद्यार्थ्यांवर चांगला प्रभाव पडला असून त्यांच्या कार्याची शाळेत कायम आठवण राहील,असे सहकाऱ्यांनी सांगितले.



**आष्टी तालुक्यातील धामणगाव येथील अफरोज बागवान हा तरुण महापुरात वाहुन गेल्याने प्रशासनाच्या वतीने चार लाख रु ची तातडीची मदतीचा धनादेश आ. सुरेश धस व तहसिलदार वैशाली पाटील यांच्या हस्ते देण्यात आला. यावेळी नायब तहसिलदार भगीरथ धारक, धामणगावचे उपसरपंच डा. सय्यद अकील, शरीफ शेख, रावसाहेब सिरसाट उपस्थित होते.**

# केज शिवसेना उबाठा टोलनाका संदर्भात रास्तारोको आंदोलन करणार -तालुकाप्रमुख अशोक जाधव

केज/प्रतिनिधी

शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने उमरी केज टोलनाका संदर्भात केज तहसील येथे निवेदन देण्यात आले. निवेदनात टोलनाका येथे अपुऱ्या सुविधा असताना अवैध टोल वसुली सुरू आहे. सदरिल टोलनाका येथिल कर्मचारी वाहन धारकांनाअर्वाच्छ,उद्धट व दादागिरीची भाषा वापरत आहेत,महिलां साठी स्वच्छतागृह नाही टोलची संगणकीय प्रक्रिया खुप हळू गतीने असते त्यामुळे अनेक वाहनधारकांना बराच वेळ टोलनाक्यावरच थांबावे लागते. यासंदर्भात शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे



तालुकाप्रमुख अशोक जाधव यांनी केज तहसीलदार यांना टोलनाका संदर्भात कायदा व सुव्यवस्था राखण्याकरिता टोल नाक्यावरिल शंभर टक्के शासनाच्या नियमांचे व अटीचे पालन होईपर्यंत सदरील टोलनाका बंद करण्यात यावा नसता केज शिवसेनेच्या वतीने तहसील समोर दि.२९ सप्टेंबर रोजी तीव्र स्वरूपाचे रास्तारोको आंदोलन करण्यात येईल असा ईशारा तालुकाप्रमुख अशोक जाधव,शहरप्रमुख तात्या रोडे,उपतालुका प्रमुख तानाजी धस, मारूती गव्हाणे,पप्पू कोल्हे,किशोर घुले, सुधिर जाधव आदिंनी दिला आहे.

# अमरसिंह पंडित यांच्या उपस्थितीत वंजारवाडी येथील कार्यकर्ते राष्ट्रवादीत

गेवराई प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस अमरसिंह पंडित यांच्या उपस्थितीत गेवराई तालुक्यातील मौजे वंजारवाडी येथील शिवसेनेचे सरपंच पांडुरंग पवार व ग्रामपंचायत सदस्य बालासाहेब पवार यांच्यासह असंख्य कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश केला. अमरसिंह पंडित यांनी सर्वांचे स्वागत करुन पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

गेवराई विधानसभा मतदारसंघातील मौजे वंजारवाडी येथील शिवसेनेचे सरपंच पांडुरंग पवार, ग्रामपंचायत सदस्य बालासाहेब पवार यांच्यासह दिलीप तारगे, अशोक पवार, वैजनाथ येवले, मारुती भांडवले, उमेश चोरमले, गोरखनाथ दाभाडे, अंकुश पवार, कैलास पवार, विश्वनाथ पवार, कमळाजी पवार, बापूराव येवले, विक्रम दाभाडे, आप्पासाहेब पवार, शिवाजी दाभाडे, देवराव दरेकर, बबन चोरमले, राधाकिसन दाभाडे, बबन मारुती पवार, कचरू दाभाडे, बाळाभाऊ पवार, बाबुराव दाभाडे, भाऊसाहेब पांचाळ, लक्ष्मण येवले, रोहिदास येवले, बबन पवार, चिंतामण पवार, अभिषेक बरकर,



शंकर पवार, महादेव पवार, सदाशिव पवार, अण्णाभाऊ पवार, शिवाजी चोरमले, आप्पा आरडे, जालिंदर पवार, मारुती पवार, सोमनाथ पवार, वसंत यादव, लिंबाजी यादव, सोसायटीचे व्हाईस चेअरमन अशोक नरवडे, विलास दाभाडे, कारभारी पवार, प्रकाश पवार, मधुकर दाभाडे, बाबासाहेब पवार, बाळू यादव, ऋषी यादव, विष्णू यादव, प्रभाकर पवार, प्रदीप येवले, आबासाहेब पवार, धोंडीराम पवार, प्रमोद चोरमले, शंकर भांडवले, संजय पवार, महादेव चोरमले, विलास चोरमले, अविनाश दरेकर, अजिंक्य ढेंगे, सिद्धांत ढेंगे, कृष्णा पवार, किशोर पवार, कार्तिक पवार, ज्ञानेश्वर चोरमले, शहादेव पवार, नंदकुमार दाभाडे, आकाश दाभाडे, बाजीराव दाभाडे, ज्ञानेश्वर पवार, अशोक दाभाडे, मुकेश पवार, कैलास दाभाडे, राजाभाऊ पवार, सतीश दाभाडे, बाळासाहेब यादव, बाळू ढेंगे, राजाभाऊ ढेंगे, भीमराव गंगाधर, बाळू गंगाधर, मोहन बरडे, विकास बरडे, दादा बरडे, भाऊसाहेब पवार, अशोक माटेकर, बाबासाहेब माटेकर आदींसह शेकडो कार्यकर्त्यांनी माजी आमदार तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस अमरसिंह पंडित यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये वंजारवाडी येथे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीमध्ये जाहीर प्रवेश केला. अमरसिंह पंडित यांनी सर्वांचे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी मध्ये स्वागत करुन येणाऱ्या काळात सर्वंनी एकजुटीने काम करुन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची भूमिका जनसामान्यांत पोहोच करावी असेही ते यावेळी म्हणाले.यावेळी झालेल्या कार्यक्रमाला बाजार समितीचे सभपती मुजीब पठाण, माजी सभापती आप्पासाहेब गव्हाणे, बाजार समितीचे माजी सभापती बबनराव मुळे, सरपंच संघटनेचे जिल्हाध्यक्ष कालिदास नवले, भेंड खुर्द चे सरपंच धनेश्वर खेत्रे, मादळमोहीचे सरपंच राजेंद्र वारंगे, कोळगावचे सरपंच राजेंद्र कदम, सावरगावचे सरपंच विष्णू पिसाळ, राजेश रसाळ, आबासाहेब कारंडे, माजी सरपंच रवींद्र पवार, दौलत दाभाडे, बाबुराव पवार, सूर्यकांत पवार, श्रीमंत पवार आदींसह राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते



# मराठवाडा मुक्ती संग्राम दिन डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यालयामध्ये उत्साहात संपन्न

बीड /प्रतिनिधी

येथील आनंद मागासवर्गीय शिक्षण प्रसारक मंडळ बीड संचलित डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यालयामध्ये मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त आनंद मागासवर्गीय शिक्षण प्रसारक मंडळ या संस्थेचे सचिव ॲड.व्ही.बी.मगर, आणि आनंद छात्रालयामध्ये संस्थेचे अध्यक्ष बी.एस. धुतालमल यांच्या यांच्या शुभहस्ते आणि राम शिंदे व सर्व संचालक, माजी मुख्याध्यापक व्ही.जी.आवाड, आणि मुख्याध्यापक बी.ए.हावळे यांच्या प्रमुख उपस्थितीत ध्वजारोहन कार्यक्रमात उत्साहात संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी महात्मा गांधी, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि स्वामी रामानंद तीर्थ यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाच्या प्रारंभी विद्यार्थ्यांची प्रभात फेरी शालेय परिसरामध्ये काढण्यात आली. याप्रसंगी कु.आर्या गालफडे आणि संस्कृती साळवे या विद्यार्थिनींनी समायोजित वकृत्व केले. या कार्यक्रमास प्रा.वसंत ओगले, श्रीमती लता ओगले, भागवत गाडे, आनंद छात्रालयाचे अधीक्षक डी.व्ही. खरसाडे हे उपस्थित होते. या कार्यक्रमाचे संचालन संतोष मेश्राम प्रस्ताविक सांस्कृतिक विभाग प्रमुख विजय देशमुख आणि आभार प्रदर्शन डब्ल्यू.एस.वाघमारे यांनी केले. याप्रसंगी आर.बी.घुले, यु.बी पवळ, श्रीमती एन.जी. मुंडे, इत्यादी शिक्षक आणि एल.बी हजारे, एस.एस. गायकवाड, भारत कोळेकर, बहुसंख्य विद्यार्थी, पालक उपस्थित होते.



# राजर्षी शाहू कन्या विद्यालयात मराठवाडा मुक्ती संग्राम दिन संपन्न

बीड /प्रतिनिधी

श्री छत्रपती राजर्षी शाहू समाज प्रबोधन मंडळ संचलित, राजर्षी शाहू कन्या प्राथमिक व माध्यमिक विद्यालय,राजमाता इंग्लिश स्कूल तेलगाव रोड बीड यांच्या संयुक्त विद्यमाने मराठवाडा मुक्ती संग्राम दिन उत्साहात संपन्न झाला.कार्यक्रमाची सुरूवात सरदार वल्लभभाई पटेल, स्वामी रामानंद तीर्थ यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. यावेळी स्वातंत्र्य सैनिक ड.रोहिदास बाबुराव कुटे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे संस्थेचे अध्यक्ष इंजि. बलभीमराव जाहेर पाटील, संस्थेचे सचिव प्रा. जे.पी. शेळके, कोषाध्यक्ष प्राचार्य ए. आर. पाटील, सहसचिव प्रा.व्ही.एल.जोगदंड,संचालक विश्वनाथ माणूसमारे,संचालक विनोद डोंगरे,संचालक इंजि.किरण जोगदंड,संचालक प्रा.ए.आर. डंबरे, से.नि.मु.अ.चव्हाण बी.बी., से.नि.मु.अ.कुकडे बी.के., से.नि. स.शि. जी.एस. झोडगे, विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीम. एस.डी. कदम, प्राथमिक चे मुख्याध्यापक श्री.आर.टी.राऊत,राजमाता इंग्लिश स्कूल च्या प्राचार्या श्रीम. आर.डी.लोखंडे यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर, कर्मचारी, विद्यार्थ्यांनी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.तसेच यावेळी राजर्षी शाहू कन्या प्राथमिक विद्यालयाच्या सहशिक्षिका श्रीमती माया शिवाजी दिवाण- सोनवणे यांचे आगामी पुस्तक रमाईही लघु कादंबरी संस्थेचे पदाधिकारी आणि उपस्थित मान्यवर यांना भेट देण्यात आली. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन व आभार प्रदर्शन जगताप एस.सी.यांनी केले. तसेच शेवटी सर्व विद्यार्थिनींना खाऊ वाटप करून कार्यक्रमाची सांगता झाली.

# डायलिसीस सुविधेचा लाभ गरजु रुग्णांनी घ्यावा - आ. विजयसिंह पंडित

## गेवराई उपजिल्हा रुग्णालयात आठ डायलिसिस मशिन कार्यान्वीत

गेवराई /प्रतिनिधी

किडणी विकार असलेल्या रुग्णांसाठी डायलिसिस सुविधा अतिशय महत्वाची आहे. डायलिसिस साठी लागणारा हजारो रुपयांचा खर्च आता वाचणार असुन महायुती सरकारने तालुकास्तरावर आशा वैद्यकीय सुविधा मोफत उपलब्ध करुन दिल्या आहेत. गेवराई उपजिल्हा रुग्णालयात आठ डायलिसिस मशिन आजपासुन कार्यरत होत असुन महाडायलिसिस सेंटर कार्यान्वीत होत असल्यामुळे गोर-गरीब किडणी रुग्णांना त्याचा लाभ होणार आहे. त्यामुळे डायलिसिस सुविधेचा लाभ गरजु रुग्णांनी घेण्याचे आवाहन आ. विजयसिंह पंडित यांनी केले. गेवराई उपजिल्हा रुग्णालयातील महाडायलिसिस सेंटर उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. यावेळी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संजय राऊत, अधिक्षक डॉ. सुरज कोठावळे, माजी नगराध्यक्ष महेश दाभाडे, माजी नगरसेवक शांतीलाल पिसाळ, राधेशाम



येवले, राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष दिपक आतकरे यांच्यासह मान्यवर व्यासपिठावर उपस्थित होते.

सार्वजनिक आरोग्य विभाग, एचएलएल लाईफ केअर लि. व उपजिल्हा रुग्णालय, गेवराई यांच्या माध्यमातुन किडणी विकार रुग्णांच्या मोफत डायलिसिस उपचारासाठी आठ डायलिसिस मशिनसह महाडायलिसिस सेंटर उपजिल्हा रुग्णालय, गेवराई येथे सुरु करण्यात आले आहे. गुरुवार दि. १८ सप्टेंबर रोजी गेवराई विधानसभा मतदार संघाचे आमदार विजयसिंह पंडित यांच्या शुभहस्ते महाडायलिसिस सेंटर चा शुभारंभ करण्यात आला. यावेळी व्यासपिठावर यावेळी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संजय राऊत, अधिक्षक डॉ. सुरज कोठावळे, माजी नगराध्यक्ष महेश दाभाडे, विनोद सौंदरमल, माजी उपनगराध्यक्ष शेख खाजाभाई, माजी नगरसेवक शांतीलाल पिसाळ, राधेशाम येवले, राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष दिपक आतकरे, डॉक्टर असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. अशोक काळे, बंटी सौंदरमल, दत्ता दाभाडे, जे.के. बाबुभाई, संदिप मडके, जिजा पंडित, विलास निकम, ॲड. मनोज हजारे, शेख सुभान, संतोष सुतार, सतिष प्रधान यांच्यासह गेवराई शहरातील पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

गेवराई डॉक्टरर्स असोसिएशनच्या वतीने अध्यक्ष डॉ. अशोक काळे व त्यांच्या संघटनेतील सहकार्यांनी गेवराई शहरात महाडायलिसिस सेंटर सुरु करुन गोर-गरीब रुग्णांना डायलिसिस सुविधा उपलबध करुन दिल्या बद्दल आ. विजयसिंह पंडित यांचा या कार्यक्रमात सत्कार करुन आभार व्यक्त केले.यावेळी डॉ. रांदड, डॉ. नोमानी, डॉ. शिंदे, डॉ. आंधळे, डॉ. शेख, मंगेश खरात यांच्यासह उपजिल्हा रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी, नर्संगी स्टाफ व इतर कर्मचारी उपस्थित होते. उपजिल्हा रुग्णालयाचे अधिक्षक डॉ. सुरज कोठावळे यांनी सर्वांचे आभार व्यक्त केले.

# जालना जिल्ह्यात शिस्त, तर जाफराबाद तालुक्यात भोंगळ कारभार; शिक्षण व पंचायत विभागाविरोधात ग्रामस्थांचा संताप!

## रेपाळा जिल्हा परिषद शाळेत दोन महिन्यांपासून शिक्षक नाही; पालक संतप्त, उपोषणाचा इशारा

जाफराबाद प्रतिनिधी हरी भालके :- जाफराबाद तालुक्यात पंचायत समिती व गटशिक्षण अधिकारी कार्यालयाच्या भोंगळ कारभारामुळे नागरिक,ग्रामस्थ व पालक त्रस्त झाले आहेत. जिल्ह्यात शिस्त दाखवली जात असली तरी जाफराबाद तालुक्यात मात्र अधिकार्यांचा बेजबाबदारपणा ठळकपणे दिसून येतोय.रेपाळा जिल्हा परिषद शाळेत तब्बल दोन महिन्यांपासून फक्त एकाच शिक्षकाच्या भरवशावर ३० विद्यार्थ्यांचे शिक्षण सुरू आहे. पहिली ते चौथीपर्यंतचे वर्ग असूनही एक शिक्षक संपूर्ण शाळा सांभाळत आहे. दोन महिन्यांत तब्बल पाच शिक्षकांची बदली झाली. काही शिक्षकांची दुहेरी कामे तर काहींनी व्यवसाय सुरू केले असल्यामुळे शाळेकडे दुर्लक्ष होत असल्याचे पालकांनी सांगितले.ग्रामस्थ व पालकांनी दोन महिन्यांपूर्वी गटशिक्षण अधिकारी शिंदे यांना तक्रार केली होती. त्यावेळी काही दिवसांसाठी शिक्षक नेमले गेले; पण अल्पावधीतच त्यांच्याही बदल्या झाल्या. परिणामी आजतागायत शाळा एका शिक्षकावरच सुरू आहे.जर पुढील दोन दिवसांत शाळेत शिक्षक नेमले नाहीत तर आम्ही शाळेला कुलूप लावून थेट जाफराबाद येथील शिक्षणाधिकारी कार्यालयासमोर उपोषण करू.श्रीहरी सुरेश देवडे, शालेय समिती अध्यक्ष, रेपाळा



मागील दोन दिवस पालक गटशिक्षण कार्यालयात धाव घेत असता एकही अधिकारी वा कर्मचारी उपस्थित नव्हता. त्यानंतर पालकांनी गटविकास अधिकाऱ्यांच्या कार्यालयाचा रुख केला मात्र तेही ऑफिसमध्ये गैरहजर होते.

नागरिकांमध्ये प्रश्न उपस्थित होत आहे जनतेने न्याय कोणाकडे मागायचा ? नागरिकांच्या मते तालुक्यातील अनेक अधिकारी फोनवर संपर्क साधल्यानंतर उचलतच नाहीत. जर उचलले, तर मी जिल्ह्याच्या मिटिंगला आहे अशी सरधोपट कारणे दिली जातात. यावर कोण कारवाई करणार ? असा प्रश्न सध्या जनतेत चर्चिला जात आहे.पंचायत समितीत तोडफोड प्रकरण दडपशाहीखाली ?

काल पंचायत समिती बांधकाम विभागाच्या कार्यालयात एका अज्ञात व्यक्तीने खुर्च्या-टेबलांची तोडफोड केली. तरीदेखील या व्यक्तीवर अद्याप कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही. यावरून पंचायत समितीवर शंका घेतली जात आहे.

तसेच घरकुल, विहीर योजना आणि निधी वाटपात देवाण-घेवाण झाली का? अशा चर्चाही जोर धरत आहेत. म्हणूनच तोडफोड करणाऱ्या व्यक्तीवर गुन्हा दाखल न केल्याचा संशय ग्रामस्थ व्यक्त करीत आहेत.या वेळी गावकरी शालेय समिती अध्यक्ष व स्थानिक नेते मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यात सरपंच गणेश शेळके, उपसरपंच दिलीप पाटील देवडे, युवा नेते भाजपाचे अमोल देवडे, शालेय समिती अध्यक्ष श्रीहरी देवडे, तसेच अनेक ग्रामस्थांचा सहभाग होता.

# समर्थ महाविद्यालय जाफराबाद येथे कवी कुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठाचा वर्धापन दिन उत्साहात साजरा

जाफराबाद /प्रतिनिधी

दि. १८ सप्टेंबर २०२५ जाफराबाद येथील समर्थ महाविद्यालयात कवी कुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक (जिल्हा नागपूर) या विद्यापीठाचा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात व विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला.या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक वर्ग, विद्यार्थी, माजी विद्यार्थी तसेच स्थानिक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात विद्यापीठाचे अधिष्ठाता व कुलगुरूंच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून व दीपप्रज्वलनाने करण्यात आली. उपस्थित मान्यवरांनी कवी कुलगुरू कालिदास यांच्या कार्याचे स्मरण करून भारतीय साहित्य, संस्कृत भाषा आणि सांस्कृतिक परंपरेत त्यांच्या कार्याचा गौरव केला.

या प्रसंगी विद्यार्थ्यांनी संस्कृत भाषेतील श्लोक पठण, भाषण, वादविवाद, निबंध स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम आणि शैक्षणिक सादरीकरण करून आपली कला व ज्ञानाची क्षमता दाखवली. विशेषतः संस्कृत ही भारतीय संस्कृतीचे मूळ आहे या विषयावर विद्यार्थ्यांनी केलेली भाषणे प्रभावी ठरली.



प्राचार्यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात सांगितले की, कवी कुलगुरू कालिदास हे भारतीय साहित्याचे शिरोमणी असून त्यांचे योगदान अमूल्य आहे. त्यांच्या नावाने स्थापन झालेल्या विद्यापीठाने हजारो विद्यार्थ्यांना ज्ञानाचा मार्ग दाखवला आहे. अशा विद्यापीठाचा वर्धापन दिन साजरा करण्याचा मान समर्थ महाविद्यालयाला मिळणे ही गौरवाची बाब आहे.




# गुरुकुलम् शिशुवाटिका शाळेत मराठवाडा मुक्ती संग्राम दिन उत्साहात साजरा

बदनापूर- (प्रतिनिधी) बदनापुर येथील गुरुकुलम् शिशुवाटिका शाळेत ७७ वा मराठवाडा मुक्ती संग्राम दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या प्रसंगी चिमुकल्यांना मराठवाडा मुक्ती संग्रामाचा इतिहास कथन करून त्याग व बलिदानाची जाणीव करून देण्यात आली.

स्वामी रामानंद तीर्थ, जनार्दन मामा नागापूरकर, दगडाबाई शेळके यांसारख्या थोर स्वातंत्र्यसैनिकांच्या कार्याचा विशेष उल्लेख करून विद्यार्थ्यांमध्ये देशभक्तीची प्रेरणा निर्माण करण्यात आली.

शाळेचे सचिव प्रा. डॉ. रामेश्वर पाटील यांनी बदनापूर पासुन अवघ्या दीड किलोमीटरच्या अंतरावर असलेले धोपटेश्वर येथील दगडाबाई शेळके यांनी त्या एक महिला असुन सुद्धा ते आपला मराठवाडा स्वतंत्र होण्यासाठी लढल्या असे अनेक अनेक स्वातंत्र्यसैनिकांच्या कार्याची माहिती दिली. तर शाळेचे व्यवस्थापक श्री. नवनाथ गव्हाणे यांनी समारोप भाषणात भारत स्वतंत्र झाल्यानंतर तब्बल १३ महिने व २ दिवसांनी मराठवाड्याला स्वातंत्र्य मिळाले, ही ऐतिहासिक बाब विद्यार्थ्यांसमोर मांडली.

ध्वजारोहण समारंभात पाडळी येथिल ग्रामस्थ अशोक नाना सिरसाठ व प्रा. डॉ. रामेश्वर पाटील यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले .

# कठोर परिश्रम, शिस्त, नियमित वाचन आणि चिकाटी शिवाय यशोशिखर गाठता येत नाही - आयपीएस नुरुल हसन

धर्माबाद / अशोक पडोळे

कठोर परिश्रम, शिस्त, नियमित वाचन आणि चिकाटी शिवाय यशोशिखर गाठता येत नाही असे प्रतिपादन भंडारा जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक श्री नुरुल हसन यांनी व्यक्त केले. ते येथील राजाराम काकाणी सहकार विद्या मंदीर व कनिष्ठ महाविद्यालय शाळेत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत होते.

विद्यार्थी जीवनात शाळेत उपलब्ध होणाऱ्या सर्व संधीचा लाभ घेत आपला व्यक्तिमत्व विकास घडविण्याच्या दिशेने प्रयत्नशील असावे असा मोलाचा सल्ला त्यांनी यावेळी विद्यार्थ्यांना दिला. शाळेतील ज्या पद्धतीने कार्यक्रमाचे नियोजन केले, सुरेख संचालन केले त्याबद्दल त्यांनी विद्यार्थ्यांचे खूप कौतुक केले

विद्यार्थ्यांनी शालेय शिक्षणा सोबतच सांस्कृतिक, क्रीडा आणि विविध वादविवाद स्पर्धांमध्ये भाग घ्यावा असेही ते विद्यार्थ्यांना म्हणाले.

धर्माबाद येथे असलेले ह्या शाळेसारखी इतर कोणतीही शाळा नांदेड जिल्ह्यात नसल्याबाबाद त्यांनी आपले प्रांजल मत मांडले आणि ग्रामीण भागातील विद्यार्थ्याकरिता शाळेचे व्यवस्थापकीय संचालक श्री सुबोध काकाणी यांनी हा प्रयत्न केल्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले. त्यांच्या या उद्दात कार्याबद्दल




त्यांची प्रशंसा केली तर माननीय हसन साहेबांनी वेळेत वेळ काढून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केल्याबद्दल त्यांचे आभार शाळेचे व्यवस्थापकीय संचालक श्री सुबोध काकाणी यांनी मानले. शाळेचे विद्यार्थी ज्या कौशल्याने आणि सहजतेने सांस्कृतिक मंच व्यवस्था व सूत्रसंचालन ज्या पद्धतीने केले त्याचेही कौतुक त्यांनी यावेळी केले. असे प्रतिपादन त्यांनी केले. श्री नुरुल हसन हे आयपी एस झाल्यानंतर त्यांची प्रथम पोस्टिंग २०१७ -२०१९ या कालावधीत धर्माबाद येथे कार्यरत होते त्यांच्या कार्याकालाचा आपल्या भाषणादरम्यान अविस्मरणीय क्षणांना उजाळा दिला.त्यांनी विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा, नागरी सेवा आणि पोलिस दलातील संधी यांविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांसोबतच्या प्रश्नोत्तर सत्रात त्यांनी प्रत्येक शंकेचे संयमपूर्वक निरसन केले आणि पुढील वाटचालीसाठी योग्य दिशा दाखवली. त्यांच्या संवादामुळे विद्यार्थ्यांना कठोर मेहनत, शिस्तबद्ध जीवनशैली आणि चिकाटीचे महत्त्व प्रकर्षाने जाणवले.

शाळेचे व्यवस्थापकीय संचालक श्री. सुबोध काकाणी यांनी आयपीएस अधिकारी नुरुल हसन यांचा सन्मान करून त्यांचे मन:पूर्वक आभार मानले. या कार्यक्रमाची वैशिष्ट्यपूर्ण बाब म्हणजे संपूर्ण कार्यक्रम विद्यार्थ्यांनी शिस्तबद्ध पद्धतीने स्वतःच हाताळला. यात शिक्षकांची कोणतीही थेट भूमिका नव्हती. यामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढतो, सार्वजनिक सभेत आपली मते मांडण्याचे धैर्य मिळते आणि नेतृत्वगुणांचा विकास होतो.

या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांमध्ये नवीन आत्मविश्वास, चिकाटीने अभ्यास करण्याची प्रेरणा आणि भविष्यात समाजासाठी काहीतरी सकारात्मक करण्याची जिद्द दृढ झाली. या बहुमूल्य मार्गदर्शनामुळे व शाळेच्या उपक्रमांमुळे संपूर्ण परिसरात आर.के.एस.व्ही.एम. शाळेचे कौतुक होत आहे. शाळेचे शिक्षक शाळेचे प्राचार्य व उपप्राचार्य यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम पार पडला तसेच श्री जगदीश दिकोंडवार आणि अनिता लखमावाड यांच्या मार्गदर्शनाखाली स्तुती काकाणी, मैथिली वडगावे, आरुषी गुंडाळे, आदिश्री कासट या विद्यार्थ्यांनी कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडला.

# लहू लक्ष्मण सोनवणे यांचे दु:खध निधन

मस्साजोग ( प्रतिनिधी )केज तालुक्यातील मस्साजोग येथील लहू लक्ष्मण सोनवणे वय ७३ वर्षे यांच दि.१७ सप्टेंबर बुधवार रोजी दुपारी दोन वाजण्याच्या सुमारास राहत्या घरी निधन झाले.



लहू दादा हे अल्पशा अजाराने अनेक दिवसापासून त्रस्त होते दि.१७ सप्टेंबर बुधवार रोजी

दुपारी दोन वाजण्यांच्या दरम्यान लहू दादा यांची राहत्या घरी प्राणजोत मावळली लहू दादा हे अत्यंत मनमिळावू स्वभावाचे होते .त्यांच्या पश्चात ,एक मुलगा, सुन,

पत्नी , नातांवडे सह असा परीवार आहे.दादा यांच्या पार्थिवावर १८ सप्टेंबर गुरुवार रोजी दहा वाजण्याचे दरम्यान मस्साजोग येथील स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांचा एक मुलगा शिक्षक असल्यामुळे केज तालुक्यातील शिक्षकांनी व नातेवाईकांनी, मित्रपरिवार , गावातील नागरीकांनी सोनवणे यांच्या कुटूंबियात सामील होऊन हळहळ व्यक्त केली आहे. तरी आज दिनांक १९ सप्टेंबर रोजी रक्षा सावडण्याचा कार्यक्रम आहे तरी नातेवाईकांना व मित्र परिवारानां कळविण्यात येते.

# मेंढ्या' व संसार वीरभद्रा पात्रात वाहून गेलेल्या महसूल विभागाकडून पंचनामा...!

## मेंढपाळांना लवकरात लवकर मदतीचे आश्वासन आमदार विलास बापू भुमरे

पैठण /प्रतिनिधी

पैठण तालुक्यात शनिवारी मध्यरात्री आलेल्या अतिवृष्टी मुसळधार पावसामुळे झालेल्या पैठण तालुक्यातील रहाटगाव येथील दोन मेंढपाळांच्या अंबादास खोलासे व मल्हारी डोईफोडे शनिवारी मध्यरात्री अतिवृष्टी पावसामुळे अचानक पूर आल्याने बकऱ्या'६ शेळी पिल्लं २'मेंढ्या १९'कोकरे २७'एक बैल दोन मोठे बछडे संसार उपयोगी साहित्य व २ मोबाईल अतिवृष्टीमुळे ओढ्याला पुर आल्याने गोदावरी पात्रात वाहून गेला लाखो रुपयांची मेंढ पाळांची नुकसान झाली त्याच अनुषंगाने काल बुधवार रोजी दावरवाडी शिवारामध्ये त्या दोन मेंढपाळ मेंढ्या वाहून गेलेल्यांचा पैठणचे आमदार विलास भुमरे व महसूल विभागाकडून काल पंचनामा करण्यात आला यावेळी म्हणाले तुम्हाला शासन कडून मदत भेटणार असल्याचे आमदार विलास बापू भुमरे त्यांनी सांगितले त्यावेळी तहसीलदार ज्योती पवार यांनी सांगितले की मेंढ्या वाहून गेलेल्या शासन मदत करणार पण ' मोबाईल वगैरे यांची काही शासनाकडुन भेटू शकत नाही पैठणचे आमदार विलास भुमरे यांनी यांच्या मार्फत संसार उपयोगी साहित्य द्यायचे आश्वासन



यावेळी मेंढपाळ यांना दिले आहे या वेळी उपस्थित महसूल विभागाचे तहसीलदार ज्योती पवार नायब तहसीलदार राहुल बनसोडे मंडळाधिकारी सुनील वाघमारे कृषी अधिकारी विकास पाटील दावरवाडी तलाठी राम मस्के नांदर तलाठी केंद्रे सरपंच डी.डी जाधव उ.स. प्रशांत देशमुख सरपंच अशोक फासाटे चेअरमन राजेंद्र वाघमोडे मिठू नन्नवरे संतोष जबडे गोपाल धारे जिजा मिसाळ विष्णू सोरमारे रहाटगाव येथील शेतकरी दावरवाडी शेतकरी शिवसेना कार्यकर्ते यांची यावेळी उपस्थिती दर्शवली होती

# सुजात आंबेडकर यांच्या भव्य यल्गार महासभेसाठी केज तालुक्यात वंचित बहुजन आघाडीची बैठक संपन्न

केज /प्रतिनिधी

परळी येथे येत्या दि.२९ सप्टेंबर रोजी होणाऱ्या युवा नेते सुजात आंबेडकर यांच्या भव्य येल्गार महासभेच्या पार्श्वभूमीवर केज येथे वंचित बहुजन आघाडी ची महत्वपूर्ण बैठक पार पडली.या बैठकीत वंचित बहुजनआघाडीचे महासचिव मिलिंद घाडगे यांच्या अध्यक्षते खाली पार पडली.या बैठकीस उपस्थित धनराज सोनवणे जिल्हा उपाध्यक्ष,जेष्ठ नेते रज्जाक सय्यद, राजेश सरवदे युवक आघाडी तालुकाध्यक्ष, जेष्ठ नेते परमेश्वर लांडगे,आदर्श जंगले युवक आघाडी तालुका उपाध्यक्ष परळी, बाळकृष्ण कसबे,शरद धिवार,जेष्ठनेते




लिंबराज गायकवाड,प्रदिप गायकवाड आदी मान्यवर उपस्थित होते.

या बैठकीत बोलताना महासचिव मिलिंद घाडगे यांनी आवाहन केले की,परळी येथे २९ सप्टेंबर रोजी होणाऱ्या सुजात दादा आंबेडकर यांच्या भव्य येल्गार महासभेसाठी केज तालुक्यातून बहुसंख्येने उपस्थित राहावे.ही केवळ सभा नसून बहुजन समाजाच्या हक्कासाठीचा एक ऐतिहासिक आवाज आहे.यावेळी त्यांनी सांगितले की,सुजात दादा आंबेडकर हे जिल्ह्यात पहिल्यांदाच येत असून,त्यांच्या नेतृत्वातून समाजाला नवा मार्गदर्शन मिळणार आहे.त्यामुळे ही सभा ऐतिहासिक ठरणार आहे.हजारोच्या संख्येने आपण उपस्थित राहून बहुजन ऐक्याची ताकद दाखवावी.केज तालुक्यातील सर्व पदाधिकारी,कार्यकर्ते व नागरिकांमध्ये या यल्गार महासभेबद्दल प्रचंड उत्साह पाहायला मिळत असून,दि.२९ सप्टेंबरला परळीत होणारी यल्गार सभा बहुजन समाजाच्या ऐक्यासाठी मोठा टप्पा ठरेल,असा विश्वास कार्यकर्त्यांनी व्यक्त केला आहे.

# जयभवानी महाविद्यालयात मराठवाडा मुक्ती दिन उत्सात साजरा

## श्रीमती आयोध्याबाई बांगर यांच्या शुभहस्ते ध्वजारोहण

पाटोदा (प्रतिनिधी)

येथिल जयभवानी महाविद्यालयात मराठवाडा मुक्ती दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.माजी स्वातंत्र्य सैनिक श्रीमती आयोध्याबाई एकनाथ बांगर यांच्या शुभहस्ते सकाळी ठिक ८:१५ वाजता ध्वजारोहण करण्यात आले.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य सोमनाथ घाडगे हे होते.तर प्रमुख पाहुणे म्हणुन मार्गदर्शक प्राचार्य डॉ.विश्वास कदम तर प्रमुख उपस्थिती मध्ये पाटोदा नगरपंचायतचे नगराध्यक्ष मा.श्री.राजेंद्र जाधव ,विकास समितीचे सदस्य श्री.शिवभूषण जाधव,विकास समिती सदस्य,श्री.दिलीपराव जाधव,माजी सभापती श्री.महादेव जाधव, डॉ.के.टी.सानप,जेष्ठ पत्रकार.श्री.विजय जाधव,श्री.विजय जोशी,श्री.राजेंद्र राऊत,श्री.नवनाथ जाधव,माजी नगरसेवक




श्री.शाहाबाज सय्यद यांची व्यासपीठावर उपस्थिती होती.कार्यक्रमाचे प्रस्ताविक सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा.डॉ.रामकृष्ण प्रधान यांनी केले.प्रथम मुक्तीसंग्रमातील शहीद स्वातंत्र्य सैनिकांना सामुहिक अभिवादन ! करण्यात आले.श्रीमती आयोध्याबाईज्ञबांगर व नगराध्यक्ष श्री.राजेंद्र जाधव यांनी मराठवाडा मुक्ती लढा या विषयी माहिती सांगुन.सर्वांना शुभेच्छा दिल्या.अध्यक्षीय समारोप प्र.प्राचार्य सोमनाथ घाडगे यांनी केला. ध्वजारोहण सोहळ्याचे संचलन क्रिडा विभागाचे प्रा. डॉ.प्रविण शिलेदार यांनी केले.तर कार्यक्रमाचे संचलन प्रा. डॉ.अशोक देवगुडे यांनी केले व आभार प्रा.शिवाजी भोरे यांनी मानले.या कार्यक्रमाचे लाईव्ह प्रेक्षपण नाटककार प्रा.बापू घोक्षे यांनी केले.या प्रसंगी सर्व प्राध्यापक वृंद